# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९४१/२०१०.

श्री. शामदेव काशिरामजी तितरमारे,
प्लॉट नं. २७, चंदननगर, नागपूर - ४४० ००९ ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. आर. कुंभरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
भंडारा.

श्री. जी. आर. बालपांडे,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.८.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, भंडारा यांचेकडे उपविभागीय अधिकारी, भंडारा यांचे महसूल आदेश व पत्र दिनांक १५.२.२०१० चे कार्यालयीन टिपणीनुसार गैरअर्जदार श्री. शेषराव शामराव कळसकर याला सिलींग जमीन वाटप नियम संदर्भात दोन मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून

... २

अपीलकर्ता यांनी दिनांक १.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २४.५.२०१० रोजी देण्यात आला असून अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून तहसीलदार, भंडारा यांनी त्यांचे अर्जातील मुद्या क्रमांक २ शी संबंधित प्रकरणाचा शोध घेऊन अपीलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती ५ दिवसाचे आंत त्यांना पुरविण्यांत यावी. असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.५.२०१० रोजी प्रकरणाचा शोध लागताच आपणास उक्त प्रकरणाच्या प्रती अविलंब उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, मुद्या क्रमांक १ ची माहिती त्यांना विसंगत देण्यात आलेली आहे. उपविभागीय अधिकारी यांचे आदेश तहसीलदार यांनी पाळलेले नसून निर्णय दिलेले आहे व मुद्या क्रमांक २ च्या संदर्भातील नस्ती अद्याप पर्यंत त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, उपविभागीय अधिकारी, भंडारा यांचे आदेश पत्रानुसार तत्कालीन तहसीलदार यांनी गुणवत्तेवर निर्णय केलेला आहे व त्या निर्णयाची प्रत अपीलकर्ता यांना दिनांक ९.४.२०१० रोजी पत्राने पाठविण्यात आलेली आहे. सदरचे प्रकरण हे १९८८-८९ मधील सिलींग जमीन वाटप संदर्भातील आहे. नस्तीच्या संदर्भामध्ये त्यांनी असे सांगितले की, मुद्या क्रमांक १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे हया कार्यालयाचे प्रकरण क्रमांक ५/एल.एन.डी.-३०/२००८-०९ मध्ये दिनांक १५.४.२०१० ला प्रकरणात आदेश पारीत करुन अर्जदारास सदर आदेशाची प्रत दिनांक १९.४.२०१० ला रजिस्ट्री पोस्टाद्वारे पाठविण्यात आली असून सदर रजिस्ट्री पोस्टाची पोच यासोबत संलग्न आहे. तसेच मुद्या क्रमांक २ नुसार गैरअर्जदार श्री. शेषराव शामराव कळसकर यांना तहसीलदार, भंडारा यांचे आदेश क्रमांक रामाक्र.१/६०-अ(५)/८८-८९, दिनांक २६.९.१९८८ नुसार सिलींग जमीन वाटप करण्यात आली त्याची संपूर्ण कागदपत्रे बाबत माहिती मागितली असून सदर प्रकरण जुने असल्यामुळे प्रकरणाचा शोध घेण्यास फारच अडचण निर्माण होत आहे. तरी सुध्दा सदर प्रकरणाचा शोध घेणे सुरु असून उक्त प्रकरणाचा शोध लागताच अर्जदारास सदर प्रकरणाची सत्यप्रत अविलंब पाठविण्यात येईल. याबाबत दिनांक ९.४.२०१० ला रजिस्टर डाकेच्या पत्राद्वारे कळविण्यात

आले. तसेच सदर प्रकरणाचा मा.जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा यांचे अभिलेख कक्षामध्ये शोध घेऊन सदर प्रकरण हया कार्यालयास पाठविण्याबाबत सुध्दा दिनांक १२.४.२०१० ला पत्र पाठविण्यात आले. त्यानुसार मा.जिल्हाधिकारी, भंडारा यांचे कार्यालयामार्फत दिनांक १५.७.२०१० ला हया कार्यालयास पत्र प्राप्त झाले असून सदर प्रकरण नोंदी रजिस्टरची तपासणी केली असता सदर प्रकरण जमा केल्याची नोंद दिसून येत नाही असे कळविले आहे. त्यानुसार सदर शाखेचे संबंधित लिपिक यांना दिनांक ३०.७.२०१० ला कारणे दाखवा नोटीस देण्यात आले असून २४ तासाचे आंत स्पष्टीकरण मागविण्यात आले. त्याअनुषंगाने दिनांक ३१.७.२०१० ला कारणे दाखवा नोटीसाचे स्पष्टीकरण माझे समक्ष सादर केले असून सदर स्पष्टीकरण असे नमुद केले आहे की, मी २००६ ला तहसील कार्यालय, भंडारा येथे तहसील कार्यालय, तुमसर येथून स्थानांतर होऊन रुजू झालो तेंव्हा तत्कालीन तहसीलदार यांनी प्रस्तुतकार १ या शाखेचे काम सांभाळण्यास सांगितले मी कार्यभार घेण्याचे अगोदर सदर शाखेमध्ये श्री. बेहरे, लिपिक हे काम पाहत होते. परंतु त्याच कालावधीमध्ये श्री. बेहरे यांना एन्टी करप्शन ब्युरो यांनी पकडल्यामुळे त्यांना मा. जिल्हाधिकारी, भंडारा यांनी निलंबित करण्यात आल्याने सदर कर्मचाऱ्यांनी प्रस्तुतकार १ या शाखेचा कोणत्याही प्रकरणाचा कार्यभार दिलेला नसल्यामुळे तसेच नस्तीबध्द केलेल्या प्रकरणाचा कार्यभार दिलेला नाही. सन १९८८-८९ वर्षापासून प्रस्तुतकार १ शाखेत बरेच लिपिक व प्रभारी अधिकारी स्थानांतर होऊन गेल्यामुळे सन १९८८-८९ वर्षात कार्यरत असलेल्या लिपीकांनी सदर प्रकरणाची यादी करुन अभिलेख कक्ष, भंडारा येथे प्रकरणाची यादी पाठविलेली नसल्यामुळे अभिलेख कक्ष, जिल्हा कार्यालय, भंडारा येथे सदर प्रकरण दिसून आले नाही. तसेच हया कार्यालयात सदर प्रकरणाचा शोध घेतला असता सदर प्रकरणाचा हया कार्यालयात अजूनपर्यंत शोध लागलेला नाही असे सदर कर्मचाऱ्यांनी आपले स्पष्टीकरणात नमुद केले आहे. सदर प्रकरण १९८८-८९ चे असल्यामुळे आज उक्त प्रकरणास एकूण ३२ वर्ष पूर्ण झालेले असल्यामुळे व हे प्रकरण खूप जुने असल्यामुळे प्रकरणाचा शोध घेण्यास अडचण निर्माण होत आहे. तरीसुध्दा प्रकरणाचा शोध घेण्याकरिता प्रत्यक्ष अर्जदार व एक नायब तहसीलदार (राजपत्रित दर्जाचा अधिकारी) व सर्व संबंधित सर्कलचे प्रस्तुतकार यांची नियुक्ती करुन सदर प्रकरणाचा अर्जदारासमक्ष शोध घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

४. यावरुन अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक १ ची माहिती उपलब्ध झालेली आहे व मुद्या क्रमांक २ च्या संदर्भामध्ये सदरच्या नस्तीचा शोध हा तालुका अभिलेखागारात तसेच जिल्हा अभिलेखागारात घेण्यात येऊन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांनी स्वतः शोध घेण्यास सहकार्य करणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयामध्ये कामकाजाचे दिवशी तारीख व वेळ कळवून उपस्थित राहून त्यांचे समक्ष नस्तीचा शोध घेण्यास सहकार्य करावे.

२) अपीलकर्ता हे उपस्थित राहिल्यास किंवा न राहिल्यास जनमाहिती अधिकारी यांनी सदरच्या नस्तीचा कसून शोघ घेणे व नस्तीचा शोध लागल्यास अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/९०८-९११/२.८.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९३६/२०१०.**

श्री. प्रबोधकुमार जगदीशप्रसाद पांडेय,
मु. रिसामा, पो. ता. आमगांव, जि. गोंदिया. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. वा. स. मानकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक,
भूमी अभिलेख, ता.जि. गोंदिया.

श्री. विष्णू सावळाराम शिंदे,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका निरिक्षक,
भूमी अभिलेख, ता. आमगांव,
जि. गोंदिया. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.८.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.६.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा भूमी अभिलेख अधिक्षक, गोंदिया यांचे कार्यालयामध्ये मौजा रिसामा येथील त.सा.क्र. ७९ चालू क्र. १०५ ची जमीन जु. गट क्र. १२२, १२४/१, १२५, १२६, १६८ ची सन १९५४ ते १९५५, १९५६ ते १९६० पी १, पी २, पी ३ चा बंदोबस्तची नक्कल नकाशा व ७/१२ देणेबाबत ही जमीन कोणाच्या मालकीची व हक्काची व कब्जात होती व

... २

कोणाचे नावे संबंधित महसूल रेकॉर्डमध्ये नोंद होती त्या बाबत लेखी माहिती दस्ताऐवजसह पुरविण्यात यावी. सन १९७४-७५ चकबंदी बंदोबस्तची नक्कल देण्यात यावी. अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना मौजा रिसामा येथील बंदोबस्त मिशल पी १ ची नक्कल देता येत नाही. कारण सदरचा अभिलेख जिर्ण व फाटक्या अवस्थेत आहे. तसेच मौजा रिसामा येथील एकत्रिकरणाचा संपूर्ण गांव नकाशा व पुनर्मोजणी गांव नकाशा यांच्या विक्रीकरिता छापील प्रत कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे सदरची माहिती पुरविता येत नाही. आपला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत केलेला अर्ज निकाली काढण्यात येत आहे असे दिनांक १२.८.२००९ रोजी कळविलेले दिसते. त्यानंतर दिनांक १२.८.२००९ रोजी पुन्हा अपीलकर्ता यांना अधिक्षक, भूमी अभिलेख यांचे आदेशाप्रमाणे विषयांकित बाबत शोध घेतला कार्यालयात दिसून येत नाही. शोध घेणे सुरु आहे. आदेशाची प्रत प्राप्त झाल्यास आपणास पत्राद्वारे कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर दिनांक ५.१०.२००० रोजी तहसीलदार, आमगांव यांचे कार्यालयातून सुध्दा अपीलकर्ता यांना जमाबंदी व धारणवही तसेच रिसामा गावाची माहिती गट नं. १२२ ते १२६ जुना शेतीचा व गावाचा नकाशा इ. बाबी बाबत जुना अभिलेख या कार्यालयास तसेच तलाठी कार्यालयास उपलब्ध नाही. त्यामुळे माहितीचा अधिकारांतर्गत विचारलेली गट नं. ची माहिती देता येऊ शकत नाही असे कळविलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ७.११.२००९ रोजी देण्यात आलेला असून माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, मागितलेली माहिती ही त्यांना तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख तसेच त्यांनी तहसील कार्यालयामध्ये अर्ज केला होता. त्या तहसील कार्यालयामधून सुध्दा माहिती उपलब्ध नाही म्हणून कळविले आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी तसेच जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांचेकडे जी माहिती उपलब्ध आहे ती बंदोबस्ता पुर्वीची १९१७ सालाची आहे. त्यातही ती जिर्ण झालेली आहे हात लावल्यास तुकडे पडतात. त्यातही पी २ ची माहिती आहे. अधिकार अभिलेख पंजीची नक्कल तहसील कार्यालय व तलाठी

कार्यालयात उपलब्ध होऊ शकते. यासंदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दिनांक ७.२.२००९ रोजी कळविण्यात आलेले आहे. दिनांक २८.१०.२००९ रोजी व दिनांक १७.९.२००९ च्या अर्जाप्रमाणे प्रत नेलेली आहे. त्यावर अपीलकर्ता यांनी पी १ ची माहिती उपलब्ध करुन घ्यावयाची असल्यास त्याची फोटोकॉपी काढून घेता येईल. परंतु छायांकित प्रत झेरॉक्स मशीन मधून काढता येणार नाही असे जनमाहिती अधिकारी तसेच अधिक्षक, भूमी अभिलेख यांनी सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांनी डिजीटल कॅमेरा घेऊन संबंधित अभिलेखाची फोटोकॉपी काढून घेतल्यास त्यांना माहिती उपलब्ध होऊ शकेल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असूंन अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात डिजीटल कॅमेरा घेऊन संबंधित पी १ अभिलेखाची फोटोकॉपी काढून घ्यावी व तशी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना परवानगी द्यावी. अधिकार अभिलेख पंजीच्या नक्कल संदर्भामध्ये तहसील कार्यालयात केलेल्या अर्जाच्या संदर्भात अपीलाचे सुनावणीचे वेळेस निर्णय देण्यात येईल.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/९१२-९१४/२.८.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९३२/२०१०.**

श्री. राजू इस्तारी खराबे,
मु. महालगांव, पो. मोरगांव,
ता. मौदा, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डॉ. विकास ढोमणे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्राचार्य,
जे. एम. पटेल महाविद्यालय,
भंडारा.

श्री. प्रा. सुमंत देशपांडे,
जनमाहिती अधिकारी तथा
जे. एम. पटेल महाविद्यालय,
भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.८.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.६.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून ज. मु. पटेल महाविद्यालय, भंडारा यांचेकडे सन २००४-०५ ते २००९-१० या कालावधीतील प्राचार्य व महाविद्यालयाशी संबंधित माहिती

मागितलेली दिसून येते. सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सोबत शिधापत्रिकाची झेरॉक्स प्रत जोडलेली आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १२.४.२०१० रोजी माहिती बरीच विस्तृत व प्रचंड व्याप्ती असणारी आहे. माहितीचा कालावधीही प्रदिर्घ असून ती माहिती विखुरलेली आहे. त्यामुळे सदर माहिती संकलित करणे, माहितीचे नस्तीकरण करणे, क्रमवारी लावणे इत्यादी प्रक्रियेसाठी ५ ते ६ महिन्यांचा कालावधी लागू शकतो. तसेच दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र सादर करावे असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २२.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक १०.७.२०१० रोजी निर्णय देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांनी स्वतः दारिद्र रेषेखालील व्यक्ती असल्याचे सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सादर करावे असा निर्णय दिलेला दिसून येतो. तसे सादर न करता अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता आज आयोगापुढे हजर झालेले नाही. दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे प्रमाणपत्र सुध्दा दिले आहे परंतु ते त्यांचे आईचे आहे. त्यावर त्यांचे नांव नाही. त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता याचे अपील हे निकाली काढण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-     दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/९१५-९१६/२.८.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९३७/२०१०.**

श्री. नरेंद्र ढेमणूजी खापर्डे,
केंद्र प्रमुख, समुह साधन केंद्र,
मु.पो. करटी/बु. , ता. तिरोडा,
जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी. एम.गंगापारी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, तिरोडा,
जि. गोंदिया.

श्री. एन. डी. पारधी,
जनमाहिती अधिकारी तथा
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, तिरोडा,
जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.८.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, तिरोडा यांचेकडे वाहन भत्ता, घरभाडे भत्ता व वेतन रद्द (स्थगीत) आदेशाच्या प्रती जून २००९, ऑगष्ट

... २

२००९ व नोव्हेंबर २००९ या कालावधीतील माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमुद करुन मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांना सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २७.१.२०१० रोजी टपाल खर्च व झेरॉक्स प्रती चालान भरुन कार्यालयात सादर करावेत असे पत्र दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक ४.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ११.३.२०१० रोजी दिला असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी ७ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना माहिती देण्याचे आदेश दिलेले दिसून येते व त्याप्रमाणे दिनांक १५.३.२०१० रोजी माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, तिरोडा यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तरीही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, वाहन भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी पुर्व सुचना पत्रक न देता रोखले आहे. याबाबत ७ दिवसात बिले काढून देतो असे सांगितले पण आजपावेतो संबंधित बिल व माहिती मिळालेली नाही. त्यामुळे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. श्री. नरेंद्र ढेमणूजी खापर्डे हे पंचायत समिती, तिरोडा शिक्षण विभागाच्या अधिनस्थ केंद्र प्रमुख या पदावर कार्यरत आहेत. श्री. नरेंद्र ढेमणूजी खापर्डे, केंद्र प्रमुख हे आपले कर्तव्य बजाविण्यात कसूर करीत असतात. त्याबाबत त्यांना वेळोवेळी कार्यालयामार्फत कारणे दाखवा नोटीस बजावून स्पष्टिकरण मागविण्यात आलेले आहे. परंतु श्री. नरेंद्र ढेमणुजी खापर्डे, केंद्र प्रमुख हे वरिष्ठांच्या आदेशाची अवहेलना करतात, मागविलेल्या कारणे दाखवा नोटीसांचे स्पष्टीकरण सादर करीत नाही. तसेच विहित मुदतीत मागविलेली माहिती सादर करीत नाही. याबाबत त्यांना बजावण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसाचे सत्यप्रती यासह जोडण्यात येत आहे. श्री. एन. डी. खापर्डे हे अपंग कर्मचारी असून त्यांना नियमाप्रमाणे ५००/- रुपये अपंग वाहन भत्ता दिल्या जात असतो. शासनाच्या दिनांक २ ऑगष्ट २००४ च्या शासन निर्णयानुसार अपंगाना विशेष वाहन भत्ता बंद करुन त्याऐवजी विहित केलेल्या अटीच्या अधिन राहून सर्वसाधारण कर्मचाऱ्यांसाठी विहित करण्यात आलेल्या दराच्या दुप्पट दराने वाहतुक भत्ता मंजूर करण्यात आलेला आहे व त्यांना अदा करण्यात येत आहे. परंतु अर्जदार यांना अपंग भत्ता किंवा सर्वसाधारण

कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेला वाहन भत्ता यापैकी एकच वाहन भत्ता अनुज्ञेय असतांना श्री. नरेंद्र ढेमणुजी खापर्डे, केंद्र प्रमुख यांना अपंग भत्ता अदा केला जात असतांना सर्वसाधारण वाहन भत्त्याची नियमबाहय मागणी केलेली आहे. शासन नियमाप्रमाणे जे कर्मचारी मुख्यालयी राहतात अशाच कर्मचाऱ्यांना घरभाडे भत्ता अनुज्ञेय असून स्वतः श्री. एन. डी. खापर्डे यांनी मी अपंग असून दिनांक १.५.२००९ पासून मुख्यालयी राहत नाही. तिरोडयावरुन येजा करतो असे मुख्यालयी राहत नसल्याचे प्रमाणपत्र कार्यालयात दिनांक २२.७.२००९ ला सादर केल्याने त्यांचे घरभाडे भत्ता बंद करण्यात आलेला आहे. श्री. नरेंद्र ढेमणुजी खापर्डे, केंद्र प्रमुख यांनी वेळोवेळी जे मुख्यालयी राहत असल्याचे प्रमाणपत्र कार्यालयात सादर केले आहे त्या मुख्यालयी प्रमाणपत्रात त्यांनी घर मालकाच्या खोटया स्वाक्षऱ्या केलेल्या असून तिनही मुख्यालयी प्रमाणपत्रावर एकाच घरमालकाच्या वेगळया वेगळया स्वाक्षऱ्या असलेले मुख्यालयी राहत असल्याचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे. गोंदिया जिल्हा नक्षलग्रस्त जिल्हा म्हणून घोषित झाल्याने या जिल्हयात कार्यरत असलेल्या व मुख्यालयी राहत असलेल्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता १५ टक्के तसेच एकस्तर वेतनश्रेणी अदा करण्याबाबतचे शासन निर्णय असल्याने व श्री. एन. डी. खापर्डे, केंद्र प्रमुख हे मुख्यालयी राहत नसल्याने त्यांना अदा करण्यात येत असलेला प्रोत्साहन भत्ता शासन नियमाप्रमाणे बंद करण्यात आला. श्री. एन. डी. खापर्डे, केंद्र प्रमुख यांनी माहिती अधिकारांतर्गत मागविलेली माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी श्री. नरेंद्र ढेमणुजी खापर्डे, केंद्र प्रमुख यांना या कार्यालयाचे पत्र क्र. पसति/शिक्षण/विअ/मा.अधि/१०५/१०, दिनांक २७.१.२०१० झेरॉक्स प्रती व टपालाची रक्कम जमा करण्याबाबतचे निर्देश पत्र संबंधिताला कार्यालयाचे गटसमन्वयक श्री. पी. एस. मेश्राम यांच्या मार्फत दिनांक २९.१.२०१० ला देण्यात आले. माहिती अधिकारांतर्गत मागविलेली माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक रकमेचे निर्देश पत्र श्री. पी. एस. मेश्राम, गटसमन्वयक यांनी कार्यालयीन पध्दतीप्रमाणे त्यांच्या हातात स्वतः व्यक्तिशः दिले. परंतु अर्जदार यांनी विहित मुदतीत मागविलेल्या माहितीसाठी आवश्यक असणाऱ्या रकमेचा भरणा न केल्याने त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. श्री. नरेंद्र ढेमणुजी खापर्डे, केंद्र प्रमुख यांनी माहिती अधिकारांतर्गत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ४.३.२०१० ला अपील सादर केली. दिनांक ११.३.२०१० ला प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे सुनावणी दरम्यान अर्जदार यांनी माहिती अधिकारांतर्गत आवश्यक रकमेचा भरणा केले नसल्याची बाब निदर्शनास

... ४

आणून दिले त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशानुसार दिनांक १५.३.२०१० ला पोस्ट ऑफीस तिरोडा यांचे मार्फत पोस्टाचा दाखला घेऊन अर्जदारास माहिती पाठविण्यात आली आहे. यासह सुलभ संदर्भाकरिता पोस्टाचे पोच पावती सादर करण्यात येत आहे. श्री. नरेंद्र ढेमणुजी खापर्डे, केंद्र प्रमुख हे आपली कर्तव्ये बजाविण्यात कसूर निष्काळजीपणा करीत असून खोटे प्रमाणपत्र सादर करुन शासनाची दिशाभूल व फसवणूक करीत असतात. अधिनस्थ कर्मचाऱ्यांना त्रास देत असतात, केंद्रांतर्गत शिक्षकांना पैशाची मागणी करीत असतात, शिस्तीचे पालन करीत नाही व स्त्री कर्मचाऱ्यांशी यांची वागणुक चांगली नाही व गैरवर्तणुक करण्यास इतर कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित करीत असतात. याबाबतचे पुराव्याच्या सत्यप्रती यासह सादर करण्यात येत आहेत. श्री. नरेंद्र ढेमणुजी खापर्डे, केंद्र प्रमुख यांना सर्व शिक्षा अभियानामार्फत केंद्र संचालनासाठी जे अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले होते ते अनुदान नियमाप्रमाणे खर्च झाले किंवा नाही याची तपासणी करण्यासाठी एस. व्ही. के. एण्ड कंपनी, पुणे यांच्या मार्फत दिनांक ३.१२.२००९ ला लेखा परिक्षणासाठी रेकॉर्ड उपलब्ध करुन देण्यासाठी भ्रमणध्वनीवरुन निर्देश देण्यात आले परंतु श्री. नरेंद्र ढेमणुजी खापर्डे, केंद्र प्रमुख यांनी रेकॉर्ड अद्यावत नसल्याने जाणुनबुजून हेतुपुरस्पर लेखा परिक्षकांना रेकॉर्ड उपलब्ध करुन दिले नाही. त्यामुळे त्यांचे माहे नोव्हेंबर २००९ चे वेतन स्थगित करण्यात आले. तसेच मुख्यालयी राहत नसल्याचे स्वतः लिहून दिल्याने त्यांचे घरभाडे भत्ता बंद करण्यात आले. श्री. नरेंद्र ढेमणुजी खापर्डे, केंद्र प्रमुख यांनी स्थगित वेतन व घरभाडे मिळण्यासाठी कर्मचारी या नात्याने स्थगित वेतन व बंद घरभाडे, प्रोत्साहन भत्ता मिळण्याबाबत विनंती अर्ज व अपील नियमाप्रमाणे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे किंवा संघटनेच्या मार्फत मागणी करणे क्रमप्राप्त असतांना माहितीच्या अधिकाराचा वापर करुन माहिती प्राप्त झाली नाही याचा दुरुपयोग करुन अधिकाऱ्यांना वेठीस धरुन नियमबाहय देयके काढून घेण्यासाठी युक्ती केलेली आहे. सबब विनंती करण्यात येत आहे की, श्री. नरेंद्र ढेमणुजी खापर्डे, केंद्र प्रमुख यांनी केलेली अपील फेटाळण्यात यावी. करिता आपल्या माहिती व पुढील योग्य कार्यवाहीस्तव आदरपूर्वक सविनय सादर. सदरच्या खुलाश्यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहेच. परंतु त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदींचा गैरवापर केलेला असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ५

# आ दे श

१) अपीलकर्ता याचे अपील हे निकाली काढण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-　　　दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९३८/२०१०.**

श्री. जोगीराम इस्तारी गहाणे,
मु.पो.ता. अर्जुनी/मोर,
जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
अर्जुनी/मोर, जि. गोंदिया.

जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
अजुनी/मोर, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.८.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.६.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी यांचे तर्फे श्री. एस. डी. प्रधान, कनिष्ठ लिपिक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, अर्जुनी/मोर यांचेकडे जिल्हाधिकारी, गोंदिया यांचे लोकशाही दिन ६.७.२००९, टोकन नं. ४२ दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मिळण्याबाबत अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २९.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे मला तहसीलदार,

... २

अर्जुनी/मोर कडून आज रोजी दिनांक २९.७.२०१० ला माहितीचा अधिकारासंबंधी माहिती मिळाली आहे. त्यामुळे मी दाखल केलेली अपील मागे घेत आहे. तरी याबाबत नोंद घेऊन अपील रद्द करावी ही विनंती असे निवेदन सादर केले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-  दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९४७/२०१०.

श्री. रत्नशील सी. फुले,
प्लॉट नं. ४८, गुरुनानकपूरा,
नागपूर - ४४० ०१७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.

श्री. एस. यु. देव,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (नियमितीकरण),
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.८.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.६.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (नियमितीकरण) उत्तर, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचेकडे मौजा नारी अनुक्रमांक १४०३, खसरा नं. १४९, १५० शेंडे नगर गृहनिर्माण संस्थामे के प्लॉट नंबर ६५ के नस्ती/फाईल मे के पुरे कागजातो की सत्यप्रत चाहिऐ.

... २

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३.२.२०१० रोजी कार्यकारी अभियंता (नियमितीकरण) यांनी त्रयस्थ पक्ष म्हणून श्रीमती कुंदा विश्राम शामकुंवर, IV-२१, एन.सी.ई.आर.टी.कॉम्पस, श्री. औरोनिन्दो मार्ग, नवी दिल्ली यांना त्यांचे संदर्भातील माहिती असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा नाही याबद्यल पत्र दिले. त्याप्रमाणे दिनांक १६.२.२०१० रोजी त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास नकार दिला व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना त्याच दिवशी दिनांक २.३.२०१० रोजी कळविण्यात आले. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक ९.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २३.४.२०१० रोजी देण्यात आलेला असून १५ दिवसाचे आंत अपीलार्थी यांनी मुळ अर्जात मागितलेले दस्तावेज विनामुल्य द्यावेत व रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठवावेत असा आदेश दिलेला दिसून येतो व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक २४.६.२०१० रोजी मुद्ये निहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगाकडे शपथपत्र दाखल केलेले आहे व त्या शपथपत्रामध्ये त्यांनी एकूण पृष्ठ ८२ दिलेले आहेत. परंतु त्यांनी पुर्वी माहिती मागितली होती तेंव्हा त्यांना ८९ पृष्ठ उपलब्ध करुन देण्याकरिता कळविण्यात आले होते व त्यामुळे त्यांनी आता मात्र कमी पृष्ठ उपलब्ध करुन दिलेली आहेत. यावरुन काही माहिती लपविण्यात आलेली आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, पृष्ठ संख्या ही मोजण्यात चुकी होऊ शकते व मागच्या वेळेस किती पृष्ठ होते त्याबद्यल आता काहीही सांगता येणार नाही. परंतु त्या नस्तीमध्ये जेवढी पृष्ठ आहेत तीच त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहेत. तरीही अपीलकर्ता यांना शंका असल्यास त्यांनी नस्तीचे निरिक्षण करणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत कामकाजाचे दिवशीची तारीख व वेळ जनमाहिती अधिकारी यांना लेखी कळवावे. त्या दिवशी जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित राहून संबंधित नस्तीचे निरिक्षण करावे.

२) अपीलकर्ता हे उपस्थित झाल्यावर त्यांना संबंधित नस्ती ही जनमाहिती अधिकारी यांनी निरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९४८/२०१०.**

श्री. हरीभाऊ गोविंदराव कुटे,
दमयंती देशमुख नगर, ता. रामटेक,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अ. मा. भट्टलवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसचिव (माध्यमिक)
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
खोली क्र. ४१३ (विस्तार), ४ था मजला,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.

श्री. म. मा. मोरवे,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यासन अधिकारी,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
खोली क्र. ४१७ (विस्तार), ४ था मजला,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.८.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.६.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.३.२०१० रोजी माहिती अधिकारी म्हणून शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई यांचेकडे महादुला, त. रामटेक, जि. नागपूर या ठिकाणी उच्च माध्यमिक शाळा (माध्यम मराठी) सुरु करण्यास परवानगी न देण्याची कारणे बाबत. सन २०००-२००१ या कालावधीतील माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद करुन मागितलेली आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २६.३.२०१० रोजी आपणास आवश्यक असलेली माहिती नियमानुसार आपणास देण्याबाबत शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविण्यात आले आहे. त्याकरिता आपला दिनांक १२.३.२०१० चा अर्ज त्यांच्याकडे पाठविण्यांत आला आहे. तरी आपण पुढील संपर्क त्यांचेशी साधावा असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक ११.६.२०१० रोजी माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, पुणे यांनी या उच्च माध्यमिक शाळेस परवानगी का मिळाली नाही याबाबत शासन स्तरावरुन माहिती उपलब्ध होऊ शकेल. तरी आपण याबाबत शासनाशी संपर्क साधावा असे कळविलेले दिसून येते. परंतु तत्पुर्वी अपीलकर्ता यांनी दिनांक ६.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली नसल्यामुळे व निर्णय झालेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, प्रस्ताव जर शिक्षण संचालकाकडून पाठविला असला तरी निर्णय हा शासन स्तरावरुन होतो. असे असतांना कार्यासन अधिकारी तथा माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज हा विनाकारण शिक्षण संचालनालय, पुणे येथे पाठविलेला आहे व शिक्षण संचालनालयाने मात्र निर्णय शासन स्तरावरुन होत असल्यामुळे शासन स्तरावरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविले. याचा अर्थ जनमाहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळच केलेली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सर्व रेकॉर्ड हा पुण्याला असतो त्यामुळे अर्ज हा पुण्याला पाठविण्यात आला होता. परंतु तसे असते तर शिक्षण संचालनालय यांनी दिनांक ११.६.२०१० रोजी जे उत्तर दिलेले आहे त्या उत्तरामध्ये सदर माहिती आपणांस पाठविण्याबाबत शासनास कळविण्यात येत आहे असे कळविले नसते. याचा अर्थ संबंधित कागदपत्रे ही शालेय शिक्षण विभागातच उपलब्ध आहेत असे दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी विशेष रजेवर

असल्यामुळे सुनावणी घेतली नाही हा अपीलकर्ता यांचा दोष नाही. त्यानंतर सुनावणी घेतली असती तर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असती. आता मात्र शासन स्तरावरुनच माहिती उपलब्ध होईल असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा आयोगापुढे सांगितले. यावरुन मंत्रालयीन विभाग हे नेहमीच त्यांना माहिती मागितली की, ते माहिती देण्यास टाळाटाळ करतात असे दिसून येते. त्यामुळे जनमाहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक राहिल. जेणेकरुन पुढे माहितीचा अर्ज आल्यावर माहिती ३० दिवसात उपलब्ध करुन देणे त्यांना बंधनकारक आहे याची त्यांना समज येईल. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय देण्यास टाळल्याने अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे व त्यामुळे त्यांचे विरुध्द सुध्दा प्रशासकीय कार्यवाही प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई यांनी करणे संयुक्तिक राहिल. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, आज त्यांनी माहिती आणली आहे व ती उपलब्ध करुन देता येईल. असे असले तरी अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

# **<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता याचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आणलेली माहिती आज उपलब्ध करुन द्यावी.

२) जनमाहिती अधिकारी यांनी माहिती ही शासन स्तरावरच असली तरी उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई यांनी करावयाची आहे व त्याकरिता सदरच्या निर्णयाची एक प्रत **<u>प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय,मुंबई - ३२</u>** यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे व त्याबाबत प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांनी योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/९२७-९३०/३.८.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९४६/२०१०.**

श्री. फैजान अख्तर व. अ. खालिक,
हंडी ओली, गुजरी बाजार, ता. कामठी,
जि. नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सोमेश्वर नैताम,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, नागपूर.

श्रीमती मौसीना अंजूम,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
राष्ट्रीय उर्दु उच्च प्राथमिक शाळा,
कामठी, जि. नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.८.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.६.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हया सुनावणी नंतर उपस्थित झाल्या व त्यांचे म्हणणे ऐकून घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, राष्ट्रीय उर्दु उच्च प्राथमिक शाळा, कामठी यांचेकडे शाळा समिती का अहवाल, प्रस्ताव (ठराव) व एकूण ४ मुद्यांमध्ये

माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १४.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १८.६.२०१० रोजी देण्यात आला असून मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती एक आठवडयाचे आंत उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. सुनावणीस मुख्याध्यापिका हजर नव्हते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मुख्याध्यापिका ही कोणतीही माहिती उपलब्ध करुन देत नाही. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका हया नंतर उपस्थित झाल्यानंतर त्यांनी आयोगापुढे लेखी निवेदन दिलेले आहे. त्यामध्ये अपीलकर्ता यांच्या दिनांक १८.२.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने उपलब्ध असलेली माहिती दिनांक ३०.४.२०१० रोजी पाठविण्यात आलेली आहे. कारण त्यांना खर्चाचा भरणा करण्यास सांगितले होते व तो खर्चाचा भरणा केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. माहिती क्रमांक १ व २ संस्थेची खाजगी माहिती असून ती उपलब्ध करुन देता येणार नाही असे त्यांना कळविले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ८.६.२०१० ला उपलब्ध असलेली माहिती देण्यात आली होती असे कळविण्यात आले होते व त्या संदर्भातील पोस्टाचा पुरावा आयोगाकडे सादर केलेला आहे. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२०१० च्या शाळा ठराव जो मागितलेला आहे ती तारीख भविष्यातील असून अजून यावयाची आहे. यावरुन अपीलकर्ता यांची माहिती मागण्याची प्रवृत्ती दिसून येते व त्यांचा त्रास देण्याचा उद्देश आहे असे दिसून येते. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास त्यांनी विनंती केलेली आहे.

४. जनमाहिती अधिकारी हया सुनावणीच्या वेळेस उपस्थित नव्हते व त्यामुळे त्यांना शास्ती करण्यात येईल असे आयोगानी जरी सांगितले असले तरी त्यानंतर उपस्थित झाल्या व माहिती पुरविण्याच्या पुर्वी सादर केलेला पुरावा दिलेला असला तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही असे म्हटले असल्यामुळे अपीलकर्ता यांना पुन्हा रजिस्टर पोस्टाने जी माहिती उपलब्ध आहे ती पाठविणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास त्यांचे विरुध्द शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-     दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९५२/२०१०.**

श्री. दत्तात्रय व्यंकटेश क्षिरसागर,
नायब तहसीलदार,
ता. देवळी, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती सुलोचना निघडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक,
जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा.

श्री. जी. डी. फरताडे,
जनमाहिती अधिकारी तथा
अव्वल कारकून (आस्थापना शाखा),
जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.८.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अव्वल कारकून (आस्थापना) कार्यालय जिल्हाधिकारी, वर्धा यांचेकडे न्यायालयीन प्रकरण क्रमांक १५९५/०६ मध्ये कार्यवाही करिता अर्जदाराने विलंब लावल्याने शासनास किंवा शासकीय अधिकाऱ्यास न्यायालयाने माफी दिल्याबाबतच्या कागदपत्रांची प्रत. सदर प्रकरणमध्ये विलंबास अर्जदार जबाबदार सिध्द झालेल्या कागदपत्रांची प्रत. सदरची

... २

माहिती व्यक्तिशः पाहिजे असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३१.५.२०१० रोजी पृष्ठ १ ते ६ अशी माहिती कळविण्यात आली. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २४.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भात दिनांक २५.६.२०१० रोजी माहिती पुरविल्यामुळे त्या व्यतिरिक्त कोणतीही माहिती उपलब्ध नसल्यामुळे ती पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, याचिका क्रमांक १५९५/२००६ मधील अवमान याचिका क्रमांक २२०/२००६ मेसर्स व्हि. एस. सेल्स कॉर्पोरेशन विरुध्द महाराष्ट्र शासन व नगर परिषद, हिंगणघाट या अवमान याचिकेमध्ये माफी मागण्यात आली. याबद्यलचे आदेश मा. उच्च न्यायालयाचे आदेशावर जिल्हाधिकारी कार्यालयाने लेखी म्हणणे दाखल केल्याची प्रत त्यांनी मागितली होती. परंतु त्यांना माहिती उपलब्ध करुन देतांना याचिकेच्या संदर्भातील माहिती उपलब्ध करुन दिली आहे. त्यांची अशी खात्री आहे की, न्यायालयापुढे माफी मागावी लागली नाही. परंतु अर्जदाराचे चुकीमुळे माफी मागावी लागली त्यामुळे त्यांची विभागीय चौकशी सुरु आहे व म्हणून सदरची माहिती ही त्यांनी मागितलेली आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यामध्ये मा.उच्च न्यायालयाचे अवमान याचिका क्रमांक २२०/२००६ मधील मा. न्यायालयाचे आदेश किंवा मा. न्यायालयाचे निर्णयामध्ये माफी मागितल्या बद्यलचे लेखी म्हणणे दाखल केले असेल तर त्याची प्रत उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. त्यामुळे त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. विशेषतः प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलाची सुनावणी घेतांना (जी घेतलेलीच नाही) अपीलकर्ता यांचे म्हणणे काय आहे हे ऐकून घेऊन योग्य तो निर्णय देणे अपेक्षित असते. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी सुध्दा तेवढयाच गुणवत्तेचे असले पाहिजे व तसे ते नसल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी हे खालून आलेल्या पत्रावर सही करुन मोकळे होतात. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना मा.उच्च न्यायालयामध्ये रिट पिटीशन क्रमांक १५९५/२००६ मधील अवमान याचिका क्रमांक २२०/२००६ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालया तर्फे जी माफी मागावी लागली त्याबाबतचे मा. न्यायालयाचे आदेश किंवा लेखी माफी मागितली असल्यास त्याबद्यल दाखल केलेले म्हणण्याची छायांकित प्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-　　　दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९५४/२०१०.

श्री. ताराचंद सागरमल चौबे,
मारवाडी मोहल्ला, सराफा लाईन,
ता. जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपजिल्हाधिकारी (भुसुधार, नझुल शाखा)
जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा.

श्री. बी. आर. वनकर,
जनमाहिती अधिकारी तथा
अव्वल कारकून,
जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.८.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.६.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) Permission given in cases of breach of condidion w.e.f. १.४.२००९ to २०.२.२०१० number of applications pending as on १.१२.२००८ for grant of permission of the breach of condition in the matter of Nazul land or lease in the wardha district. Give list alongwith their names.

... २

२) Applications received for grant of permission w.e.f.१.१२.२००८ to २०.२.२०१० Give list along with the name of persons who have applied. ३) Number of applications in which find orders have been passed till date, out of pending applications as on १.१२.२००८ and received between the period १.१२.२००८ to २०.२.२०१० Give list with names and date of order. ४) If any orders of stay have been received on R. & F. D. Resolation and the proceedings/minutes of meeting held on २७.११.२००७ under the Chairmanship of Hon'ble Revenue Minister of Maharashtra. ५) Action taken on the representation dated १७.११.२००९ given to be Collector, Wardha along with deputation of people about the above subject. Give copy of action taken if any. Also give copy of representation. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ११.३.२०१० रोजी अपीलकर्ता यांना अतिरिक्त खर्च रुपये ७५/- चा भरणा करावा. वरील शुल्क आपण या कार्यालयाकडे प्रदान करावे किंवा मनिऑर्डर पाठवावी किंवा शासकीय कोषागारात भरणा करावा आणि या कार्यालयास चलनची एक प्रत पाठवावी आणि माहितीच्या संदर्भातील कागदपत्रे घेऊन जावे. सदरील शुल्काची रक्कम माहितीचा अधिकार शुल्क व खर्चाचे नियमन, नियम २००५ अन्वये जमा करावी. कृपया दिनांक १८.३.२०१० किंवा तत्पुर्वी प्रदान करावे असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक २०.३.२०१० रोजी आवक लिपिक यांचेकडे उपजिल्हाधिकारी (भुसुधार) नझुल शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा यांचेकडे मी दिनांक १२.३.२०१० रोजी आपले कार्यालयात गेलो असता श्री. चौरेबाबु ला सांगितले की, मी आपले पत्राप्रमाणे रुपये ७५/- घ्या आणि माहिती द्यावी. त्यांनी माझ्याकडून शुल्क न घेता बोरीकरबाबु कडून माहिती घेऊन देईल त्यांच्याकडे मागितलेली माहिती तयार नव्हती. मी दिनांक १८.३.२०१० व दिनांक २०.३.२०१० रोजी आपले कार्यालयात प्रत्यक्ष गेलो असता माहिती मिळाली नाही व संबंधित बाबु भेटले नाही. जेंव्हा माहिती तयार नाही तर अर्जदाराला त्रास व खोटे पत्र देणे योग्य नाही. सहपत्र नाही. पुढील अर्जंट कार्यवाही करावी असे पत्र दिलेले दिसून येते व त्यानंतर दिनांक ९.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी जे ७५/- रुपये अतिरिक्त खर्चाचा भरणा करण्याकरिता तयारी दर्शविली असतांना सुध्दा श्री. चौरे यांनी त्यांचेकडून अतिरिक्त खर्चाचा भरणा भरुन घेतला नाही व त्यांना २-३ वेळ तसे केले तरी त्यांचेकडून खर्चाचा भरणा करुन घेतला नाही व त्यांना लेखाशिर्ष सुध्दा दिला नाही. त्यांनी उपजिल्हाधिकारी यांचेकडे दिनांक २०.३.२०१० रोजी तक्रार सुध्दा केली होती. परंतु विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना दिनांक २६.७.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे व माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात माहितीचे अतिरिक्त शुल्क भरले नसल्यामुळे त्यांना त्यावेळेस माहिती तयार असुन सुध्दा माहिती मुदतीत देता आली नाही.

४. विशेषतः अपीलकर्ता यांना विहित मुदतीमध्ये अतिरिक्त खर्चाचा भरणा करावा व ते कशा पध्दतीने करावा हे स्पष्टपणे पत्रामध्ये दिले नाही. अपीलकर्ता यांनी पुर्वी सुध्दा चलानद्वारे खर्च भरलेला आहे त्यांचेकडे चलानची पावती आहे. याचा अर्थ त्यामध्ये लेखाशिर्ष दिलेला आहे असे असुन सुध्दा त्यांनी त्या कार्यालयामध्ये प्रत्यक्षरित्या किंवा मनिऑर्डर किंवा चालानद्वारे खर्चाचा भरणा केलेला नाही. मात्र दिनांक २०.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे तक्रार न करता किंवा त्यांना तसे पत्र न देता त्यांनी उपजिल्हाधिकारी यांना उद्देशून आवक लिपिकाकडे पत्र दिलेले आहे. याचा अर्थ त्यांना अधिनियमाचे तरतुदीची काहीही कार्यपध्दती पाळली नाही. माहिती अधिकारी यांना जशा कायद्याच्या तरतुदी लागू आहेत तशाच अपीलकर्ता यांना सुध्दा लागू आहेत. अपीलकर्ता यांना योग्य त्या रितीने कळवून सुध्दा तसे कोणत्या नियमाप्रमाणे खर्चाचा भरावा करावा लागतो हे कळवून सुध्दा अपीलकर्ता हे निरनिराळया बाबूंना भेटतात असे ते सांगतात. विशेषतः माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता व सर्व प्रक्रियाकरिता जनमाहिती अधिकारी हेच जबाबदार असतात व अपीलकर्ता हे मात्र जनमाहिती अधिकारी यांना न भेटता इतरांना भेटतात व तक्रार ही आवक कक्षात उपजिल्हाधिकारी यांना करतात व आयोगापुढे आल्यानंतर मात्र त्यांना दंड करा अशी सारखी मागणी करतात. अपीलकर्ता यांना सुध्दा माहिती हवी असल्याने नियमाचे अधिनियमाचे पालन करणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी

प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही.  त्यामुळे त्यांनी अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे.  त्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे.  अपीलकर्ता यांना दिनांक २६.७.२०१० रोजी विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली व माहिती उपलब्ध करुन दिल्यावर जे ७५/- रुपये भरणा करावा असे त्यावर लेखी दिलेले आहे.  अशा प्रकारे प्रशासकीय गलथानपणा दिसून येतो.  अशा जनमाहिती अधिकाऱ्यांमुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीची योग्य ती  अंमलबजावणी होत नाही.  परंतु याबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांनी प्रशिक्षण आयोजित करणे आवश्यक आहे.  असे असले तरी सदरची माहिती उपलब्ध झालेली असल्याने अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता याचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-          दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/९३७-९४०/३.८.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९६५/२०१०, अपील क्रमांक ९६६/२०१०, अपील क्रमांक ९६७/२०१०, अपील क्रमांक ९६८/२०१० व अपील क्रमांक ९६९/२०१०.**

श्री. बुध्दम यादोराव मेश्राम,
अध्यक्ष,
जनसेवा जयलक्ष अन्याय भ्रष्टाचार निराकरण समिती,
न्यु आशिर्वाद नगर, गिरोला (कारधा), ता. जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. आर. भंडोपीया,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
राष्ट्रीय महामार्ग उपविभाग क्र. ५५,
भंडारा.

जनमाहिती अधिकारी तथा
टोलटॅक्स नाका, कारधा,
महामार्ग क्रमांक ६, भंडारा.

श्री. वा. स. मानकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक,
भुमी अभिलेख, गोंदिया.

श्री. विष्णू शिंदे,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका निरिक्षक,
भूमी अभिलेख,
ता. अर्जुनी/सडक, जि. गोंदिया.

श्री. आर. आर. कुंभारे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. जि. भंडारा.

... २

जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
भंडारा.

श्री. जे. बी. संगितराव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. रामटेक, जि. नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
मौदा, जि. नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.८.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये पाच द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १२.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ४.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या पाचही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ४.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. अपील क्रमांक ९६५/२०१० मधील प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. अपील क्रमांक ९६६/२०१० मधील उत्तरवादी हे हजर आहेत. अपील क्रमांक ९६७/२०१० मधील प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. अपील क्रमांक ९६८/२०१० व अपील क्रमांक ९६९/२०१० मधील प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचेतर्फे श्री. जी. एस. कोकर्डे, नायब तहसीलदार हे हजर आहेत.

२. अपील क्रमांक ९६५/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी म्हणून टोलटॅक्स नाका, कारधा, महामार्ग क्र. ६, भंडारा यांना अध्यक्ष, जनसेवा जयलक्ष अन्याय भ्रष्टाचार निराकरण समिती. गिरोला (कारधा) यांनी टोलटॅक्स वसुली संबंधाने एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे

अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १३.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिला नाही मात्र दिनांक ७.५.२०१० रोजी अपीलकर्ता यांना एकूण ७ मुद्यांवर माहिती दिली असुन करारनाम्याच्या प्रतीकरिता रुपये २२२/- अधिक पोस्टेज चार्ज रुपये ७१/- असे एकूण रुपये २९३/- शासकीय चालानद्वारे कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, क्रमांक १४, नागपूर यांचे नांवे भरुन चालानची प्रत या कार्यालयात सादर करावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी आयोगाकडे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांचा माहितीचा अर्ज हा कार्यालयातून माहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झाला नव्हता. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, सदरचा अर्ज टोल नाक्यावर दिलेला होता. परंतु टोल नाक्यावर माहिती अधिकारी नसतात. कंपनीचे कार्यालय असते. त्यामुळे सदरचा अर्ज हा टोल नाक्यावर राहिल्यामुळे नंतर अपील प्राप्त झाल्यानंतर अध्यक्ष, जनसेवा जयलक्ष अन्याय भ्रष्टाचार निराकरण समिती यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे पत्र दिले व खर्चाचा भरणा करावा असेही पत्र दिले. परंतु त्यांनी अद्याप पर्यंत खर्चाचा भरणा केलेला नाही. त्यांना पत्र उपलब्ध झाले नाही असे अपीलकर्ता यांनी सांगितले. तसेच अध्यक्ष, जनसेवा जयलक्ष अन्याय भ्रष्टाचार निराकरण समिती ही शासकीय समिती नाही. तसेच ती धर्मदाय आयुक्त यांचेकडे पंजीबध्द समिती नाही व ती अधिकृत समिती नसल्यामुळे त्यांच्या अर्जाची दखल घेण्याची आवश्यकता नव्हती. तरीसुध्दा त्रास होऊ नये म्हणून त्यांनी दिनांक १३.४.२०१० रोजी पत्र पाठविले होते. अधिनियमाचे कलम ३ प्रमाणे नागरिकास अर्ज करता येतो व अशा प्रकारची कोणतीही अधिकृत/अनाधिकृत संस्थेस हा अधिकार दिलेला नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांना दिनांक ७.५.२०१० रोजी जे पत्र दिलेले आहे ती माहिती त्यांनी विनामुल्य उपलब्ध करुन दिली व करारनाम्याच्या प्रतीकरिता मात्र मुद्या क्रमांक ८ प्रमाणे खर्चाचा भरणा करुन घेणे आवश्यक राहिल. त्यांनी खर्चाचा भरणा केल्यास करारनाम्याच्या प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता जनमाहिती अधिकारी यांनी अर्ज किंवा उपलब्ध माहितीच फेटाळलेली नसल्यामुळे सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

... ४

४. अपील क्रमांक ९६६/२०१० मध्ये अपीलकर्ता या संस्थेने दिनांक १२.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, ता. अर्जुनी/सडक यांचेकडे श्री. रमेश चंद्रभान यावलकर यांचे संदर्भातील शेत जमीनीच्या संदर्भात व दुरुस्ती करण्याचे संदर्भामध्ये एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १०.५.२०१० रोजी रुपये ८/- पृष्ठ ४ करिता खर्चाचा भरणा करावा असे पत्र दिलेले दिसून येते. तरीही अपीलकर्ता यांनी दिनांक १४.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३१.५.२०१० रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना नकलेच्या स्वरुपात माहिती न मागता प्रश्न विचारले आहे. त्यामुळे सदरची माहिती पुरविता येऊ शकत नाही. मुद्या क्रमांक १ ची माहिती त्यांना उपलब्ध झालेली आहे. तक्रारी अर्जाचे संबंधात तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, सडक अर्जुनी यांनी माहे जून २०१० अखेर रितसर चौकशी करुन इकडील कार्यालयास अहवाल सादर करणेबाबत सुचना दिलेली आहे. त्यामुळे अपील खारीज केलेली दिसून येते. यावरुन सदरच्या अर्जाचे संदर्भामध्ये माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. परंतु अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, मोजणी अजून झालेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाकडे असे सांगितले की, मौक्यावर मोजणी होऊ शकत नाही. त्याकरिता पोलीस संरक्षणाची आवश्यकता आहे व पोलीस संरक्षण अपीलकर्ता यांनी घ्यावयाचे आहे. त्याकरिता जनमाहिती अधिकारी यांनी मोजणीची तारीख अपीलकर्ता यांना देणे व अपीलकर्ता यांनी त्या तारखेस पोलीस संरक्षण मागणे संयुक्तिक राहिल. मात्र माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

५. अपील क्रमांक ९६७/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १५.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसील कार्यालय, भंडारा यांचेकडे अर्जदार सौ. प्रियंका महेश घोडेस्वार, सुयोगनगर, जवाहरनगर, भंडारा यांचे संदर्भामध्ये व सौ. सिमा सुमेध शामकुंवर, कोंढी, जवाहरनगर, भंडारा यांचे संदर्भामध्ये एकूण ९ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.४.२०१० रोजी माहिती ही एकूण १३ प्रतीमध्ये असल्यामुळे रुपये २/- प्रतीप्रमाणे एकूण २६/- रुपयांचा खर्चाचा भरणा करावे असे पत्र दिलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २४.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ८.६.२०१० रोजी देण्यात आलेला असून अपील फेटाळण्यांत आलेले आहे व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... ५

६. या अपीलात नागरीकांनी अर्ज न करता संस्थेने अर्ज केलेला आहे. परंतु त्या अर्जाचे संबंधात सुध्दा जनमाहिती अधिकारी यांनी कार्यवाही केलेली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना खर्चाचा भरणा करण्यासाठी पत्र जावक लिपिकांकडे दिले होते. परंतु ते तसेच पडून राहिले व त्यामुळे जावक लिपिकांची दोन वेतनवाढ थांबविलेली आहे. असे असले तरी प्रथम अपीलाचे सुनावणीचे संदर्भामध्ये कार्यालयातील शिपाई श्री. ए. बी. जांभूळकर यांनी दिनांक २६.५.२०१० रोजी गेले असता नोटीस घेण्यास नकार दिला व सुनावणीचे वेळेस सुध्दा ते हजर राहिले नाही. तहसीलदार, भंडारा हजर होते. त्यावरुन त्यांचे अपील कागदपत्रावरुन तहसीलदार, भंडारा यांचेकडे मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक ७.६.२०१० रोजी पुरविण्यात आली असता ही माहिती अर्जदाराने घेण्यास नकार दिल्याचे दस्तऐवज दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना माहितीची आवश्यकता नसल्याचे दिसून येते. त्यावरुन सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांना विहित मुदतीत कोणताही पत्र व्यवहार झालेला नसल्यामुळे माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

७. अपील क्रमांक ९६८/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसील कार्यालय, मौदा, नागपूर यांचेकडे सौ. मिराबाई नामदेव कांबळे यांच्या शेतीच्या फेरफार संबंधाने दिनांक १३.१.२०१० रोजी जो अर्ज दाखल केलेला आहे त्या अर्जाचे संदर्भामध्ये एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १४.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा देण्यात आलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

८. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक १५.५.२०१० रोजी रुपये २/- प्रती प्रमाणे रेकॉर्डची तपासणी करुन मिळेल असे त्यांना कळविण्यात आले होते. त्यावर अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ते तहसीलदार यांचेकडे गेले होते. परंतु त्यांनी कोणत्याही प्रकारचा

खर्चाचा भरणा करुन घेतला नाही व माहिती सुध्दा दाखविली नाही. दिनांक ३.६.२०१० रोजी तहसीलदार यांनी मुद्या क्रमांक २ ते ६ ची माहिती प्रश्नोत्तर स्वरुपाची असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम, २००५ मध्ये मोडत नसल्यामुळे सदर माहिती देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु त्याच दिवशी पुन्हा दिनांक ९.४.२०१० च्या अर्जावर तलाठयाकडून अहवाल मागितलेला आहे. अहवाल प्राप्त होताच आपणास पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. यावरुन माहितीचा अर्ज हा योग्य रितीने हाताळण्यात आलेला नाही असे दिसून येते. अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १३.१.२०१० च्या अर्जाच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. परंतु अर्जावर काय कार्यवाही झाली ही माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. अभिलेख तपासणी करिता प्रती रुपये २/- हे सुध्दा नियमाप्रमाणे नाही. याचा अर्थ तहसीलदार सारख्या अधिकाऱ्यास नियमाची माहिती नाही असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही व आपण कशावर सही करतो त्यांना कळत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

९. अपील क्रमांक ९६९/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून तहसील कार्यालय, मौदा यांचेकडे श्री. दशरथ संपत दुपारे यांनी दिनांक ९.४.२०१० च्या तक्रार अर्जामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती एकूण ६ मुद्यांवर मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १४.६.२०१० प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

१०. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक १३.५.२०१० रोजी मागितलेली माहितीचा अर्थबोध होत नाही. आपण स्वतः व्यक्तिशः हजर राहून आपणास पाहिजे असलेली माहिती रुपये २/- प्रती प्रमाणे रेकॉर्डची तपासणी करुन मिळेल असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरच्या अतिरिक्त खर्चाचा भरणा करण्यास ते गेले असता तहसीलदार यांनी त्यास कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिलेला नाही व प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय झालेला

नाही. वरील अपीलामध्ये ज्याप्रमाणे नियमाची माहिती तहसीलदार यांना नाही असे म्हटले आहे. तसेच या अर्जाचे संदर्भात सुध्दा उत्तर दिलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अशंतः मंजूर करण्यास पात्र आहे.

११. वरील सर्व अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी अध्यक्ष म्हणून अर्ज केलेला आहे. परंतु सदरची संस्था ही कोणत्याही अधिनियमाखाली पंजीबध्द नसल्यामुळे अनधिकृत व बेकायदेशीर आहे. तसेच अधिनियमाचे कलम ३ प्रमाणे नागरिकांना अर्ज करण्याचा अधिकार आहे संस्थेस अधिकार दिलेला नाही. संस्थेस जो पत्र व्यवहार होतो त्याची कोणीही जबाबदारी घेत नाही व पत्र मिळाले नाही असेच जे कोणी अध्यक्ष आयोगापुढे हजर होतात ते सांगतात. त्यामुळे संस्था ही अर्जदार होऊ शकत नाही. परंतु या सर्व अपीलांमध्ये अर्जदारास जनमाहिती अधिकारी यांनी त्याप्रमाणे कोणत्याही प्रकारे कळविले नसल्यामुळे व त्यांच्या अर्जाचे संदर्भात पुढील प्रक्रिया केली असल्यामुळे सदरचे अपील हे फेटाळून लावणे योग्य नाही. परंतु यापुढे संस्थेनी अर्ज केल्यास त्याबाबत अधिनियमाचे कलम ३ प्रमाणे अर्ज नाकारणे संयुक्तिक राहिल.

## आ दे श

१) अपीलकर्ता याचे अपील क्रमांक ९६५/२०१०, अपील क्रमांक ९६७/२०१०, अपील क्रमांक ९६८/२०१० व अपील क्रमांक ९६९/२०१० ही सर्व अपीले अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना प्रत्येक जनमाहिती अधिकारी यांनी अर्जावर नीट अवलोकन करुन मुद्येनिहाय व कागदपत्राचे स्वरुपात माहिती रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ९६६/२०१० हे खारीज करण्यात येते.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/९१८-९२४/४.८.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९६३/२०१०.

श्री. शामदेव काशीरामजी तितरमारे,
प्लॉट नं. २७०, चंदननगर, पो. हनुमाननगर,
नागपूर - ४४० ००९. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जे. बी. संगीतराव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
रामटेक, जि. नागपूर.

श्री. शिवराज पडोळे,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
पारशिवनी, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.८.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १२.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ४.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, पारशिवनी यांचेकडे दिनांक ७.९.१९९२ ला अतिरिक्त जमीन वाटप संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक ४.८.२०१० रोजी राज्य माहिती आयुक्तांना निवेदन सादर केले असून आज माझे अपीलावर सुनावणीपूर्वी तहसीलदार, पारशिवनी यांनी मला पाहिजे असलेली माहिती पूर्ण

... २

दिली आहे व भविष्यात पण मला हवी असलेली माहिती वेळेत देण्याचे मान्य केले आहे व उपविभागीय अधिकारी, रामटेक यांचे पण आश्वासन मिळाले आहे. तरी सुनावणी न घेता समझोता आपण मान्य करावा अशी विनंती केली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९७८/अम/२०१०, अपील क्रमांक ९७९/अम/२०१०, अपील क्रमांक ९८०/अम/२०१०, अपील क्रमांक ९८१/अम/२०१०, तक्रार क्रमांक २०२/अम/२०१० व तक्रार क्रमांक २०३/अम/२०१०.**

श्री. गजेंद्र अ. वारके,
द्वारकामाई, द्वारकामाई नगर,
कांडली, पो. परतवाडा, जि. अमरावती. ..... **तक्रारकर्ता/अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जी. एन. वाहूरवाघ,
जनमाहिती अधिकारी तथा,
मुख्याधिकारी,
नगर परिषद, अचलपूर,
जि. अमरावती. ..... **गैरतक्रारदार**

श्री. जी. एन. वाहूरवाघ,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
मुख्याधिकारी,
नगर परिषद, अचलपूर,
जि. अमरावती.

श्री. मनीष चोमवाल,
जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
पाणी पुरवठा विभाग,
नगर परिषद, अचलपूर,
जि. अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.८.२०१०)**

**नि र्ण य**

तक्रारकर्ता/अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक ३.७.२००९, दिनांक ५.१०.२००९ व दिनांक २१.११.२००९ रोजी दोन तक्रार दाखल केली आहे व दिनांक २२.१०.२००८, दिनांक २५.७.२००९, दिनांक ७.९.२००९ व दिनांक २३.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार

... २

अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये चार द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ५.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची व द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ५.८.२०१० रोजी घेण्यात आली. तक्रारदार/अपीलकर्ता व गैरतक्रारदार/उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपील क्रमांक ९७८/अम/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २७.६.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, अचलपूर यांचेकडे पाणी पुरवठा देयकाबाबत दिनांक १.१.२००३ ते २७.६.२००८ पर्यंत एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती लिखित स्वरुपात घरपोच पाठवावी असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २५.७.२००८ रोजी एकूण २२०० दस्तावेजापोटी रुपये ११०००/- संबंधित माहिती अधिकाऱ्यांकडे रोखीने ३ दिवसांचे आत भरावी व एकूण ६ मुद्यांच्या संदर्भात त्यांना माहितीबद्यल स्पष्टीकरण देण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ३०.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी अमरावती खंडपीठामध्ये अपील क्रमांक १५७४/२००८ हे दाखल केले होते. सदरच्या अपीलाच्या निर्णयामध्ये खंडपीठाने दिनांक २०.१०.२००९ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद यांना आदेश देण्यात येतो की, त्यांनी आजपासून १ महिन्याचे आंत प्रथम अपीलासंबंधी पुन्हा सुनावणी घ्यावी व सुनावणीला अर्जदाराला प्रत्यक्ष बोलवावे व त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन आदेश पारित करावा असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दिनांक १२.११.२००९ रोजी सुनावणी घेऊन दिनांक १३.११.२००९ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी पुन्हा राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते. द्वितीय अपीलाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दिनांक १९.१.२०१० रोजी राज्य माहिती

आयुक्तांनी तक्रार अर्ज निकाली काढत दिशाभूल करणारा आदेश निर्गमित करुन चुकीचे आदेश दिले आहे असे आरोप तक्रार करुन केलेले असल्यामुळे मा. राज्य माहिती आयुक्त, अमरावती खंडपीठ, अमरावती यांनी अपीलकर्ता यांचे प्रकरण मा.मुख्य आयुक्त, मुंबई यांचेकडे योग्य निर्णय देण्यासाठी पाठविण्यात आले व त्यामध्ये दोन्ही तक्रार मा.मुख्य माहिती आयोग यांनी सुध्दा ऐकल्यानंतर सदरचे प्रकरण त्या आयोगाकडे पाठवून असे परिक्रमा केली असल्यामुळे सदरची दोन्ही प्रकरणे सुनावणीस पाठविण्यात आलेली आहेत.

४. खंडपीठ अमरावती यांचे आदेशाप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १३.११.२००९ रोजी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली. परंतु सुनावणी घेतली व प्रथम अपील खारीज केले. आदेशामध्ये माहिती उपलब्ध झाली असे नमुद केलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना आता पर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना २/- रुपये प्रती प्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी व त्यांनी त्यास मान्यता दिली व त्यामुळे माहिती घेऊन जातील हे गृहीत धरुन ते अपील खारीज करण्यात आले होते. मुळातच जनमाहिती अधिकारी यांनी २२०० पृष्ठासाठी रुपये ११०००/- ची आकारणी करणे हे नियमबाहय आहे. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाने नकाशा किंवा कागदपत्रे तयार करुन द्यावयाची असतात त्याकरिता ठरविण्यात आलेली फी आकारणे बरोबर आहे व जी माहिती तयार आहे त्यांची फोटोकॉपी फी आकारण्याकरिता प्रती पृष्ठ रुपये २/- व पृष्ठाचा आकार हा मोठा असल्यास पृष्ठाचा खर्च व टपाल खर्च आकारणी करावी अशी तरतुद आहे व त्यामुळे जी माहिती कागदपत्राचे स्वरुपात उपलब्ध आहे त्यांची छायांकित प्रती ही रुपये २/- प्रमाणे आकारणे आवश्यक होते व ती २२०० पृष्ठे अधिक टपालखर्च असे आकारण्यात आले असते. परंतु जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, नगर परिषदेने ५/- रुपये पृष्ठ याप्रमाणे ठराव केला असल्यामुळे तशी फी आकारण्यात आली होती व ती नियमाची माहिती नसल्यामुळे व गैरसमजूतीने आकारण्यात आली होती. प्रथम अपीलाचा निर्णय हा निश्चित निष्कर्ष दिला असला पाहिजे. जर तर च्या भाषेत कोणताही आदेश होऊ शकत नाही व प्रथम अपीलाची सुनावणी ही प्रथम अपील दाखल केल्यानंतर ३० दिवसात करणे आवश्यक असते व विशिष्ट परिस्थितीमध्ये कारणे देऊन ४५ दिवसात होणे

आवश्यक असते. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील निदर्शनास आणले जात नसल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांना योग्य ती प्रशासकीय कार्यवाही त्यांच्या अधिनस्त कर्मचाऱ्यां विरुध्द केल्या शिवाय नियमाचे पालन होणार नाही याची त्यांनी खबरदारी घेणे आवश्यक आहे. प्रथम अपीलाचा निर्णय जरी दिला असला तरी त्या निर्णयाचे संदर्भात माहिती उपलब्ध झाली नाही असेच आयोगापुढे अपीलकर्ता यांनी सांगितले व आता इतक्या विलंबाकरिता ही माहिती विनाशुल्क उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. परंतु माहिती उपलब्ध करुन देण्यास छायांकिंत प्रतीचा जो खर्च येईल तो खर्च हा जनमाहिती अधिकारी यांनी स्वतः करणे संयुक्तिक राहिल व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

५. अपील क्रमांक ९७९/अम/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी श्री. मनिष चोमवाल, कनिष्ठ अभियंता, पाणी पुरवठा विभाग, नगर परिषद, अचलपूर यांचेकडे सुनंदा पांडे (ग्राहक क्रमांक १२०५) यांचे संदर्भामध्ये तसेच अब्दुल कैसर अब्दुल रशिद, रा. धारणी व प्यारेलाल भुता सेमलकर, रा. चुरणी, ता. चिखलदरा या दारिद्रय रेषेखालील अर्जदाराने केलेल्या अर्जानुसार त्यास निशुल्क माहिती कां पाठविण्यात आली नाही. तसेच आपले कार्यालयात सहाय्यक जनमाहिती अधिकारी कोण आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी कोण आहेत याबद्यलची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती लवकरात लवकर घरपोच पाठवा असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २.४.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ४.४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. वरील अपीलाचे संदर्भात प्रथम अपीलाचे संबंधी जी तक्रार करण्यात आली होती त्या तक्रारीच्या अनुषंगाने प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली असून दिनांक १५.३.२०१० रोजी मात्र माहिती मिळाल्याचे अपीलकर्ता यांनी मान्य केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांना तशी माहिती ही विहित मुदतीत उपलब्ध झालेली आहे. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. परंतु अपीलकर्ता यांनी अर्जामध्ये घरपोच माहिती पाठवावी असे नमुद केलेले आहे तशी तरतुद अधिनियमात किंवा नियमात नाही. माहिती हवी असल्यास ती टपालाने किंवा व्यक्तिशः अपीलकर्ता यांना मिळू शकते. व्यक्तिशः याचा अर्थ अर्जदारानी जनमाहिती अधिकारी यांचेकडे जाऊन माहिती व्यक्तिशः उपलब्ध करुन घ्यावी असा होतो.

... ५

६. अपील क्रमांक ९८०/अम/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २८.५.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी, नगर परिषद, अचलपूर यांचेकडे उपआयुक्त (सा.प्र.) यांनी अपील क्र. ३/नपाप्र/उपआ(साप्र)/ २००९, परतवाडा प्रकरणात दिनांक २९.४.२००९ रोजी पारित आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीबाबत मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचे कार्यालयीन पत्र क्र. प्रासनप्र/मा.अ./उले/कावि-२०८/ ०९, दिनांक २९.४.२००९ नुसार मुख्याधिकारी, नगर परिषद, अचलपूर यांनी काय कार्यवाही केली आहे. श्री. संतोष देऊस्कर, उपसंचालक, नगर परिषद प्रशासन, संचालनालय, मुंबई यांचे दिनांक १९.५.२००९ चे पत्रानुसार काय कार्यवाही केली आहे याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २७.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही व त्यामुळेच वर विवेचन केल्याप्रमाणे पुढील सर्व कार्यवाही होऊन राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचेकडे सुनावणीस आलेले आहे.

७. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरच्या अर्जाबद्यल त्यांना काहीही माहिती नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, नगर परिषदेमध्ये विषयानुसार जनमाहिती अधिकारी नियुक्त केलेले आहेत व संबंधित अर्ज प्रशासकीय संदर्भातील असल्यामुळे प्रशासकीय जनमाहिती अधिकारी यांचेकडे त्याबद्यलची माहिती असणे अपेक्षित आहे. परंतु प्रत्येक विभागास अनुरुप जनमाहिती अधिकारी वेगळे असतील तर त्यांना उपस्थित ठेवण्याची जबाबदारी मुख्याधिकारी यांची आहे. त्याप्रमाणे आज संबंधित अधिकारी उपस्थित नाही. परंतु जे माहिती अधिकारी उपस्थित आहेत व त्यांनी त्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे सांगितले. तसेच अपीलाचे संदर्भात जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे व त्याकरिता सदरचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

८. अपील क्रमांक ९८१/अम/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा राज्य माहिती आयुक्त, अमरावती यांचेकडे नगर परिषद, अचलपूर येथे प्रथम अपीलीय अधिकारी कोण आहेत व अचलपूर मुख्याधिकारी यांचे संबंधी प्रथम अपीलाचे संदर्भातील माहिती मागितलेली

... ६

दिसून येते.  ही माहिती सविस्तरपणे लिखित स्वरुपात घरपोच पाठवावी असे त्यांनी आयोगास विनंती केलेली आहे.  सदरचा अर्ज हा दिनांक १.८.२००९ रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद, अचलपूर यांचेकडे हस्तांतर करण्यात आलेला आहे असे अपीलकर्ता यांना कळविलेले आहे.  परंतु पुन्हा अपीलकर्ता यांनी दिनांक २१.११.२००९ रोजी आयोगाकडे तक्रार अर्ज केलेला आहे.  त्या तक्रारीच्या संदर्भामध्ये वर विवेचन आलेले आहे.  परंतु अपीलकर्ता यांना ज्या कार्यालयात माहिती उपलब्ध आहे त्या कार्यालयात माहिती न  मागता राज्य माहिती आयोगाकडून अर्ज हस्तांतर करुन माहिती उपलब्ध करुन देण्याचा मार्ग स्विकारला आहे.  राज्य माहिती आयोगाचे ते कर्तव्य नाही व राज्य माहिती आयोग हे पोस्ट ऑफीस सुध्दा नाही.  अपीलकर्ता यांना माहिती पाहिजे असेल तर ती त्यांनी संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाच्या जनमाहिती अधिकाऱ्यांकडेच अधिनियमाचे कलम ६(१) प्रमाणे अर्ज करणे आवश्यक असते.  त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

९.	वरील सर्व अपीलाचे संदर्भामध्ये प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली नव्हती म्हणून खंडपीठ, अमरावती यांचेकडे तक्रारी करण्यात आल्या होत्या.  त्या तक्रारीच्या अनुषंगाने प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली.  परंतु अपीलकर्ता यांना माहिती मिळाली नव्हती म्हणून अपीलकर्ता यांच्या चारही अपीलांवर पुन्हा सुनावणी घेण्यात आली व त्यामुळे तक्रार क्रमांक २०२/अम/२०१० (तक्रार क्रमांक २३९/२००९) व तक्रार क्रमांक २०३/अम/२०१० (तक्रार क्रमांक ३२५/१२/२००९) हे खारीज करण्यात येते.

**आ दे श**

१) अपीलकर्ता याचे अपील क्रमांक ९७८/अम/२०१० हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत २२०० पृष्ठांची माहिती विनामुल्य अपीलकर्ता यांचे घरपोच उपलब्ध करुन द्यावी व पोच घ्यावी.

२) सदरच्या २२०० पृष्ठांच्या छायांकित प्रतीचा खर्च हा संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी स्वतः करावयाचा असून प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी यासंबंधामध्ये स्वतः खर्चाची वसुली करुन ती नगर परिषद फंडामध्ये जमा करण्यात यावी.

३) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ९७९/अम/२०१०, अपील क्रमांक ९८१/अम/२०१०, तक्रार क्रमांक २०२/अम/२०१० व तक्रार क्रमांक २०३/अम/२०१० हे खारीज करण्यात येते.

४) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक९८०/अम/२०१० हे मंजूर करण्यात येत असून तत्कालीन संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक २८.५.२००९ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये ५०००/- ची शास्ती लादण्यात येत असून सदरच्या शास्तीची वसुली संबंधित जनमाहिती अधिकारी यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावे.

५) सदरची कार्यवाही ही मुख्याधिकारी, नगर परिषद, अचलपूर, जि. अमरावती यांनी करावयाची आहे.

६) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-　　　दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/९२७-९३३/५.८.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९८८/२०१०.**

श्री. मिलींद भास्करराव पवार,
रामनगर, ता. सिंदेवाही,
जि. चंद्रपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. आर. जोगी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार, आर्णी, जि. यवतमाळ.

श्री. सुधीर पवार,
जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
आर्णी, जि. यवतमाळ. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.८.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.६.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, यवतमाळ यांचेकडे मौजा गणगांव शेती सर्व्हे जुना ६९/२ नवीन सर्व्हे २१७ च्या ७/१२ वर वारसानाचे नांव चढविण्यात यावे अशी माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २६.३.२०१० रोजी अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, आर्णी यांनी

... २

माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ११.४.२०१० रोजी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २६.५.२०१० रोजी देण्यात आला असून तहसीलदार, आर्णी यांनी दिनांक २६.५.२०१० रोजी उपविभागीय अधिकारी, यवतमाळ यास अहवाल रेकार्ड पाठविलेला दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना वारसांन लावण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे विनंती केली आहे. परंतु वारसान हे तलाठी यांचेकडे अर्ज दिल्यानंतर लावण्यात येते व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारची कार्यवाही करुन मिळत नाही. तलाठी यांचेकडे वारसान लावण्याची कार्यवाही होते असे असले तरी अपीलकर्ता यांनी अर्ज मात्र उपविभागीय अधिकारी यांचेकडे केला व अपील सुध्दा जिल्हाधिकारी यांचेकडे केले. वास्तविक अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे सदरची दोन्ही अपीले व अर्ज हे फेटाळून लावणे आवश्यक होते. परंतु तरीही उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी यांनी सदरच्या अपीलाचे संदर्भात जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे पाठविले. अपीलकर्ता यांना वारसान लावून घ्यावयाचे आहे व त्याकरिता दबाव पत्रांचा वापर करीत आहेत असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. असे असले तरी त्यांना विहित मुदतीत उत्तर दिले आहे व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात यावे अशी विनंती केलेली आहे. जनमाहिती अधिकारी यांचे उत्तर योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता याचे अपील हे निकाली काढण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/९३४-९३५/९.८.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९९१/२०१०.**

श्री. सुभाष एन. माहोरे,
मु. पो. कुरझा, ता. ब्रम्हपूरी,
जि. चंद्रपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी (महसूल)
ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.८.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.६.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हे गैरहजर असून ग्रामपंचायत निवडणूक असल्यामुळे उपस्थित राहता येणार नाही असे त्यांनी आयोगाकडे विनंती केलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी मात्र कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, ब्रम्हपूरी यांचेकडे दिनांक ७.१.२००७ व दिनांक ७.१.२००९ ला केंद्रीय माहितीचा अधिकार कायदा, २००५ नियम ३ अन्वये अर्जदार यांनी केलेल्या अर्जावर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या टिपणी, पत्र, आदेशांच्या स्वाक्षांकित प्रती.

... २

माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २३.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २.६.२०१० रोजी देण्यात आला असून जनमाहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. परंतु माहिती अधिकारी यांना अर्ज उपलब्ध झाला नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांना सांगितल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी अर्ज प्राप्त करुन घेऊन माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार यांनी पुढील कार्यवाहीसाठी माहिती आयोगापुढे कागदपत्राचे स्वरुपात प्रतिनिधी मार्फत दाखल करता आली असती. परंतु ती दाखल केली नाही. परंतु अपीलकर्ता यांचा अर्ज हा प्राप्त का नाही याबाबत कार्यालयात चौकशी करुन जबाबदारी निश्चित करुन तो अहवाल आयोगाचे कार्यालयास सादर करता आला असता. परंतु तोही अहवाल सादर केलेला नाही व त्यामुळे जनमाहिती अधिकारी किंवा कनिष्ठ अधिकारी किंवा कर्मचारी ज्यांनी सदरच्या अर्जावर योग्य ती कार्यवाही केली नसेल त्यांचे विरुध्द जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करणे आवश्यक होते. पण तशीही कार्यवाही केली नाही व त्यामुळे संबंधित जनमाहिती अधिकारी किंवा जे अधिकारी किंवा कर्मचारी यांनी सदरच्या अर्जावर कार्यवाही केली नाही ते दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु आज जनमाहिती अधिकारी हे हजर नसल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता येत नाही व त्याकरिता त्यांना कारणे दाखवा नोटीसद्वारे विचारणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता याचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २५.२.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक २५.२.२०१० च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे किंवा अर्जावर कार्यवाही झाली नसल्यामुळे संबंधित जनमाहिती अधिकारी किंवा कनिष्ठ अधिकारी किंवा कर्मचारी यांचे विरुध्द रुपये ५०००/- ची शास्ती लादण्यात येते.

३) उपविभागीय अधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी चौकशी करुन जबाबदारी निश्चित करुन शास्तीची वसुली ही संबंधित अधिकाऱ्यांचे/कर्मचाऱ्यांचे वेतनातून दरमहाचे वेतनातून वसूल करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावे.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/९३६-९३८/९.८.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९८४/२०१०.**

श्री. सुदाम श्रीराम बाराहाते,
१४, मिलींद सोसायटी, नरेंद्रनगर,
नागपुर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त,
लक्ष्मीनगर झोन क्र. १,
महानगरपालिका, नागपूर.

श्री. विजय कहालकर,
उपविभागीय अभियंता,
लक्ष्मीनगर झोन क्र. १,
महानगरपालिका, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.८.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, लक्ष्मीनगर झोन क्र. १, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे तक्रार अर्ज दिनांक २४.११.२००९ व अर्जदाराचा अर्ज दिनांक ११.१.२०१० ची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक

... २

९.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोगास निवेदन सादर केले असून अर्जदाराचा अर्ज दिनांक २४.११.२००९ व दिनांक ११.१.२०१० नुसार कारवाईची माहिती जसे की, मौका पाहणी अहवाल, कार्यालयीन अहवाल सत्यप्रत मिळाली नाही असे लेखी निवेदन सादर केले आहे. परंतु माहिती मिळाली असल्याचे तोंडी कबुल केले व रोजनाम्यावर त्याबाबत स्वाक्षरी केली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/९३९-९४०/९.८.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९९५/२०१०.

श्री. संजय व. मोरे,
पाल पेट्रोल पंप समोर,
न्यु पांजरा, कोराडी, ता.कामठी,
जि. नागपुर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. बी. आर. सिंग
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.८.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे शैक्षणिक वर्ष २००७ ते २०१० पर्यंत एकूण ७ मुद्यांमध्ये शाळांची माहिती

... २

मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक १०.८.२०१० ला शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कडून मागितलेली माहिती मला देण्यात आली आहे तरी मी आज अपील अर्ज मागे घेत आहे. तरी अपील अर्ज खारीज करण्यात यावे अशी अपीलकर्ता यांनी विनंती केली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १००४/२०१० व अपील क्रमांक १००५/२०१०.

श्री. योगेश मुरलीधर जगताप,
सम्राट अशोक चौक, चोरखिडकी वार्ड,
चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डि. सी. चकोले,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय वन अधिकारी (मुख्यालय व नियोजन)
गडचिरोली वनवृत्त, गडचिरोली.

श्री. एस. डी. गिरी,
अधिक्षक,
विभागीय वन अधिकारी (मुख्यालय व नियोजन)
गडचिरोली वनवृत्त, गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.८.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या दोन्ही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १०.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. वरील पैकी दोनही अपीलामध्ये अनुक्रमे ८.४.२०१० रोजी व दिनांक ५.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, दक्षिण चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांचेकडे सन २००७-०८ मध्ये झालेल्या उमेदवारांचे नोकर भरती संबंधात अ, ब, क, ड, ई, फ व ग मुद्यांमध्ये मध्ये तसेच जाहिरात क्रमांक कक्ष-(३)/३५०२,

... २

दिनांक ११.१०.२००७ नुसार प्रकाशित झालेल्या उमेदवारांचे नौकर भरती प्रक्रिये संबंधात माहितीबाबत अ, ब व क मुद्यांमध्ये माहिती स्वतः व्यक्तिशः घेणार असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते. अपील क्रमांक १००४/२०१० चा अर्ज दिनांक ८.४.२०१०च्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ११.५.२०१० रोजी ३४ पृष्ठे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १२.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ४.६.२०१० रोजी देण्यात आला असून उर्वरित माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु तरीसुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. अपील क्रमांक १००५/२०१० चा अर्ज दिनांक ५.३.२०१० च्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ५.४.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ६.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १५.४.२०१० रोजी देण्यात आला असून त्यामध्ये काही माहिती उपलब्ध करुन दिली आहे काही माहिती उपलब्ध झाली नाही ती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो व त्याप्रमाणे दिनांक २९.४.२०१० रोजी पुन्हा काही माहिती उपलब्ध करुन दिली व सॉफ्टवेअरची माहिती उपलब्ध करुन देण्यास कंपनीस दिनांक २९.४.२०१० रोजी पत्र दिले आहे. माहिती उपलब्ध होताच आपणास पुरविण्यात येईल असे कळविले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. वरील दोन्ही अपीलांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे दोन्ही अपीले खारीज करण्यास पात्र आहेत.

**आ दे श**

१) अपीलकर्ता याचे अपील क्रमांक १००४/२०१० व अपील क्रमांक १००५/२०१० ही दोन्ही अपीले खारीज करण्यात येतात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/९४३-९४५/१०.८.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९९९/२०१०.

श्री. टी. आर. पटले,
प्लॉट नं. ८, ताजणे ले आऊट,
पांडूरंग मंगल कार्यालयामागे,
साईनगर, गोधनी रोड, नागपुर - ४४० ०३०. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. म. ता. कांबळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव,
कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व
मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

जनमाहिती अधिकारी तथा
अवर सचिव,
कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व
मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.८.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, मंत्रालय, मुंबई यांचेकडे विवरण ख मध्ये एकूण अ, ब, क, ड व ई व त्यातही १, २, ३ व ४

अशा प्रकारच्या मुद्यांच्या माध्यमातून शासकीय दुग्ध योजनेच्या संदर्भात आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभाग, मुंबई यांच्या दिनांक ३.३.२००५ च्या पत्रात अनुसरुन दोषारोप पत्र सादर करण्यात आले होते. तसेच विभागीय चौकशी सुरु करण्याचा प्रस्ताव होता त्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २१.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांचे तर्फे श्री. केळकर यांनी बाजू मांडली. श्री. केळकर यांचेकरिता श्री. टि. आर. पटले यांनी माहिती मागितलेली दिसून येते. कारण चौकशी प्रकरणामध्ये श्री. केळकर आहेत. मागितलेली माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांनी आयोगास सांगितले. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय न देता जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ६.५.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिली असे आयोगाचे निदर्शनास आणले. परंतु सदरच्या माहितीचे पत्र अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेले नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यांना सर्वच पत्रे उपलब्ध होतात परंतु हेच पत्र उपलब्ध झाले नाही. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी सदरचे पत्र निर्गमित केल्याचा पुरावा हा आयोगापुढे सादर केला नाही. त्यावेळेस अधिनियमाचे कलम ८(१) (त्र) प्रमाणे चौकशी सुरु असल्यामुळे गोपनीय कारणास्तव नाकारण्यात आली होती. परंतु आता त्या प्रकरणाचा संपूर्ण निर्णय झालेला असल्यामुळे ती संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले व अपीलकर्ता यांनी सुध्दा मान्य केले व त्यांनी ती सर्व माहिती उपलब्ध करुन घेतली आहे. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता याचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १००८/२०१०.**

श्री. प्रविण पुंडलिकराव राऊत,
३६५, सहयोग नगर, नारी रोड,
पो. उप्पलवाडी, नागपुर - ४४० ०२६. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कृषी विकासअधिकारी,
जिल्हा परिषद, वर्धा.

श्री. आर. एच. मरघडे,
जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा कृषी अधिकारी,
जिल्हा परिषद, वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.८.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ११.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचेकडे अपीलकर्ता यांच्या निलंबनाच्या कालावधीत व विभागीय चौकशीच्या कालावधीच्या संदर्भामध्ये एकूण ८ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने

... २

अपीलकर्ता यांना दिनांक ११.६.२०१० रोजी मुद्येनिहाय माहिती व १९ पृष्ठे उपलब्ध करुन दिली आहेत. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १४.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ६.७.२०१० रोजी दिला असून माहिती अधिकारी यांनी माहिती दिली या कारणासाठी सदरचे अपील खारीज करण्यात आले आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना निलंबन कालावधीतील किंवा विभागीय चौकशीचा काळ वाढविण्याकरिता शासनाचे कडून मंजूरी घेतल्याचे पत्र उपलब्ध नाही असे कळविले आहे त्या पत्राची प्रत त्यांना पाहिजे आहे. त्यांनी पुढे असेही सांगितले की, त्यांनी सर्व नस्तीचे अवलोकन केले आहे व त्यात ते मंजूरी पत्र उपलब्ध नाही. याचा अर्थ मागितलेले पत्र उपलब्ध नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांचे कार्यालयात जी माहिती उपलब्ध आहे ती त्यांना उपलब्ध करुन दिली आहे. मान्यतेचे पत्र उपलब्ध नाही यांचा अर्थ मान्यता घेतली नाही असे त्यांना अर्थ काढता येईल. यावरुन उपलब्ध झालेली सर्व माहिती पुरविण्यात आली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता याचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/९४९-९५०/११.८.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १००७/२०१०.**

श्री. उज्जवलकुमार वासुदेवराव बागडे,
वार्ड क्र. १७, ता. सावनेर, जि. नागपुर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. विनोद जाधव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुध्याधिकारी,
नगर परिषद, सावनेर, जि. नागपूर.

श्री. पंकज छेनिया,
जनमाहिती अधिकारी तथा
पाणी पुरवठा विभाग प्रमुख,
नगर परिषद, सावनेर, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.८.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ११.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, सावनेर यांचेकडे जानेवारी २००७ मधील नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत १ ते १७ वार्डातील ज्या नगरसेवक पदाच्या निवडणूकीतील उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशेब सादर केला नाही त्यांची नांवे व त्यांचेवर झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद

... २

केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १०.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १६.७.२०१० रोजी देण्यात आला. त्यामध्ये जनमाहिती अधिकाऱ्यांचे उत्तर समाधानकारक वाटत नसल्याने माहिती शोधून त्वरित अपीलार्थीला देण्यात यावी असे निर्देश देण्यात आले. पुन्हा अशा प्रकरणात दिरंगाई होता कामा नये अशी ताकीद देण्यात आली व माहिती विनामुल्य देण्यात यावी असा निर्णय दिलेला आहे. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, आयोगाचे कार्यालयातून नोटीस निघाल्यानंतर दिनांक २७.७.२०१० रोजी सदर नस्ती निवडणूक संपल्यानंतर निवडणूक कार्यालय स्थानांतरणामुळे गहाळ असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर नस्तीचा शोध घेण्यात येत आहे. नस्ती प्राप्त होताच आपणांस संबंधित माहिती विनामुल्य देण्यात येईल असे कळविले. यावरुन त्यांना विहित मुदतीत काहीही माहिती कळविण्यात आलेली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, स्थानांतरण झाले असून ती नस्ती माहिती नाही. परंतु दिनांक ६.५.२०१० रोजी श्री. पी. डी. छेनिया या लिपिकाकडे सदरची नस्ती देण्यात आलेली आहे अशी टिपणी दिसून येते. यावरुन सदरच्या नस्तीचा शोध घेतला गेला नाही असाच निष्कर्ष काढावा लागतो. अन्यथा श्री. पी. डी. छेनिया यांचे बयान घेऊन आयोगापुढे सांगणे आवश्यक होते. अन्यथा अपीलकर्ता यांना सुध्दा तसे कळविणे आवश्यक होते. आयोगाचे कार्यालयातून नोटीस आल्यानंतर मात्र तात्काळ पत्र व्यवहार केलेला दिसून येतो. याचा अर्थ असा आहे की, आता पर्यंत शांत बसलेले दिसून येते. त्यामुळे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व माहिती उपलब्ध करुन देण्यास त्यांनी टाळाटाळ केलेली आहे असाही निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. शास्ती बद्यल त्यांचे म्हणणे ऐकून घेतले होते. नस्तीचा शोध घेतला असता मिळत नाही एवढेच त्यांचे उत्तर आहे. परंतु ते समाधानकारक नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

... ३

# <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता याचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत संबंधित नस्तीचा शोध घेण्यात येऊन अपीलकर्ता यांना माहिती विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) जनमाहिती अधिकारी यांनी अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे विहित मुदतीत म्हणजे ३० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना काहीही कळविले नसल्यामुळे व प्रथम अपीलाचे नंतर सुध्दा नस्ती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये १००० शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली त्यांचे दरमहाचे वेतनातून करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करण्यात यावे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/९५१-९५३/११.८.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १००६/२०१०.**

सौ. अ. प. कचडे,
द्वारा - श्री. रामदास शंकर घुगल,
वार्ड क्र. ८, काकडे ले आऊट,
होळी चौक, ता. सावनेर, जि. नागपुर. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. विनोद जाधव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुध्याधिकारी,
नगर परिषद, सावनेर, जि. नागपूर.

श्री. पी. आर. पांडे,
जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
नगर परिषद, सावनेर, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.८.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक १५.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ११.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १३.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, सावनेर यांचेकडे दिनांक २९.१२.२००८ च्या तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २६.४.२०१० रोजी अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून

... २

येते. परंतु अपीलकर्ती यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १७.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २४.६.२०१० रोजी देण्यात आला असून कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. अपीलकर्ती यांना श्रीमती सोनवणे यांचे बांधकामाबाबत केलेल्या तक्रारीनुसार त्यांना या कार्यालयाद्वारे नोटीस देण्यात आली असून त्यांचेवर फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल केला असला तरी त्याच्या प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. तशी ती प्रत त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावी. मात्र अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता याचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/९५४-९५५/११.८.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०२४/२०१०, अपील क्रमांक १०२५/२०१०, अपील क्रमांक १०२६/२०१०, अपील क्रमांक १०२७/२०१० व अपील क्रमांक १०२८/२०१०.**

श्री. मनोहर धकाते,
अंचलेश्वर वार्ड, जि. चंद्रपूर - ४४२ ४०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. एम. हस्ते,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, हायकोर्ट जवळ, सदर, नागपूर.

श्री. एस. व्ही. राठोड,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, हायकोर्ट जवळ, सदर, नागपूर.

श्री. मनोहर जगन्नाथजी गणराज,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी,
प्रधान वनसंरक्षक कार्यालय,
वन भवन, सिव्हील लाईन, नागपूर.

श्री. गणेश तानुजी कऱ्हाडे
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी (कक्ष-१३),
प्रधान वनसंरक्षक कार्यालय,
वन भवन, सिव्हील लाईन, नागपूर.

श्री. कृष्ण मोहन
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
नागपूर वनवृत्त, झिरो माईल, नागपूर. ... २

जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी (कक्ष- ७ अ)
प्रधान वनसंरक्षक कार्यालय,
वन भवन, सिव्हील लाईन, नागपूर.

श्री. एस. व्ही. अलुरवार,
जनमाहिती अधिकारी तथा
विभागीय वन अधिकारी (नियोजन)
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
नागपूर वनवृत्त, झिरो माईल, नागपूर.

श्री. डि. सी. चकोले,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय वन अधिकारी (मुख्यालय व नियोजन)
वनसंरक्षक, गडचिरोली वनवृत्त, गडचिरोली.

श्री. एस. डी. गिरी,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
वनसंरक्षक, गडचिरोली वनवृत्त, गडचिरोली. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.८.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये पाच द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १२.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या पाचही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १२.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपील क्रमांक १०२४/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ११.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, सदर, नागपूर यांचेकडे १९८४ ते

आजपावेतो या कालावधीतील जाती वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे पदावनत केलेल्या कर्मचारी/अधिकारी यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसुन येते. विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १५.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना अद्याप पर्यंत त्यांनी मागितलेली माहिती मिळाली नाही. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले की, त्यांचे कार्यालयात माहितीचा अर्ज व प्रथम अपीलाचा अर्ज प्राप्त झालेला नाही. त्यावर अपीलकर्ता यांनी आयोगास कुरीअर पावती दाखविली. परंतु त्या पावतीवर स्विकृतीची सही नाही. तसेच कुरीअर कंपनीने केलेली कार्यवाही नाही किंवा कुरीअर कंपनीची कोणत्याही कार्यालयाची सही नाही. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक १०२५/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, कक्ष-१३, प्रधान मुख्य वन संरक्षक यांचेकडे श्री. प्रभाकर आनंदराव चव्हाण यांनी मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांच्या विरुध्द महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग, मुंबई यांचेकडे दाखल केलेल्या प्रकरण क्रमांक ३४४१/०४-०५ मध्ये दिनांक २०.४.२००५ ला दिलेल्या निर्णयात परिच्छेद क्रमांक २ मध्ये श्री. चव्हाण, लेखापाल यांच्या विरुध्द केलेल्या विभागीय चौकशीच्या अहवालाची प्रमाणित झेरॉक्स प्रत पुरविण्यात यावी. सदरची माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ९.६.२०१० रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १४.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३१.७.२०१० रोजी दिलेला आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

... ४

५. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मानवाधिकार आयोगाचे आदेशामध्ये स्पष्टपणे विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे असा निष्कर्ष काढण्यात आलेला दिसून येतो व त्या आधारावर त्यांनी विभागीय चौकशीच्या संदर्भातील माहिती विचारली. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ९.६.२०१० रोजी जे उत्तर दिलेले आहे त्यामध्ये श्री. प्रभाकर आनंदराव चव्हाण यांच्या जात पडताळणी संबंधाने सादर केलेल्या अहवालात त्याचे विरुध्द विभागीय चौकशी चालू करण्यात आलेली आहे असा उल्लेख दिसून येत नाही. त्याची प्रत संलग्न अपीलकर्ता यांना दिलेली आहे तरी यासंबंधी विभागीय चौकशी चालू करण्यात आल्याचे अभिलेख्यावरुन दिसून येत नसल्याने त्यांच्या प्रमाणित प्रती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांचेकडील प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३१.७.२०१० रोजी देण्यात आला. परंतु त्यापुर्वीच राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दिनांक १४.६.२०१० रोजी दाखल केले व द्वितीय अपील हे दिनांक १७.७.२०१० रोजी दाखल केलेले आहे. अधिनियमाचे तरतुदी प्रमाणे प्रथम अपीलाचा निर्णय हा ३० दिवसामध्ये किंवा विशिष्ट परिस्थितीमध्ये ४५ दिवसामध्ये देणे आवश्यक असते व त्यामुळेच ३० दिवस पूर्ण झाल्यानंतर अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे ते योग्य आहे. वास्तविक जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना जी माहिती दिली ती स्वयंस्पष्ट आहे. राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांचे पत्र दिलेले आहे ती ही माहिती त्यांना दिलेली आहे. सदर माहिती उपलब्ध झाल्यानंतर प्रथम अपील किंवा द्वितीय अपील करण्याची आवश्यकता नव्हती. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

६. अपील क्रमांक १०२६/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ८.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी-१३, प्रधान मुख्य वनसंरक्षक, वनभवन, नागपूर यांचेकडे अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती अ, ब, क, ड इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील कर्मचारी/अधिकारी यांनी माहिती प्रपत्रात दिलेल्याप्रमाणे द्यावी, अशी माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे मागण्यात आलेली आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ७.५.२०१० रोजी मागितलेली माहिती अतिशय जुनी व जास्त कर्मचाऱ्यांच्या संबंधित असल्यामुळे माहिती संकलित करण्याची कार्यवाही या कार्यालयाचे

... ५

स्तरावर सुरु असून त्यास काही कालावधी लागणार आहे. तरी माहिती तयार होताच पाठविण्याची तजविज ठेवली आहे असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १०.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर दिनांक ४.६.२०१० रोजी अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाचे सुनावणीस हजर राहण्यास कळविण्यात आले व त्या दिवशी त्यांना एकूण ११३ पृष्ठे देण्यात आली व त्यानंतर दिनांक १४.६.२०१० रोजी प्रथम अपीलाचा निर्णय देऊन मुख्य लेखापाल, लेखापाल, लिपिक, नाईक व शिपाई या संवर्गातील कर्मचाऱ्यांची उपलब्ध माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. त्यानंतर दिनांक २२.६.२०१० रोजी त्यांना काही माहिती उपलब्ध करुन दिली. तसेच जी माहिती उपलब्ध आहे ती पुरविण्याची तरतुद आहे. नव्याने माहिती तयार करुन द्यावयाची तरतुद नाही. तरी त्यांना काही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

७. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती अपूर्ण आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती विद्यमान कार्यालयात नसून जूनी १९८७ पासून ती माहिती आहे व त्यांनी विशिष्ट प्रपत्रामध्ये तयार करुन मागितलेली आहे. वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध असल्यास छायांकित प्रती पुरविणे असे अपेक्षित आहे. तसेच व्यापक प्रमाणात सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा अशी माहिती संकलित करुन उपलब्ध करुन देण्याकरिता जर प्रमाणाबाहेर वळवावी लागत असेल तर ती अधिनियमाचे कलम ७(९) प्रमाणे देण्यास बंधनकारक नाही असे दिसून येते. परंतु तरीही अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व माहिती नाकारण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. त्यानंतरही अपीलकर्ता यांना माहिती पाहिजे असल्यास हया १९८७ पासूनच्या सर्व नस्त्या वेळोवेळी कार्यालयाचे स्थानांतर झाले असल्यामुळे इतरस्तः आहेत व अपीलकर्ता यांनी नस्तीचे अवलोकन केल्यास त्यातून त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यातही जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व ते म्हणजे शासनाचे नुकसान केलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरच्या नस्तीचे निरिक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे. ... ६

८.	अपील क्रमांक १०२७/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २५.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा वनसंरक्षक (मानव संसाधन विकास) वनभवन, नागपूर यांचेकडे श्री. एम. जे. गणराज, प्रशासकीय अधिकारी यांच्या नियुक्तीच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २२.३.२०१० रोजी श्री. एम. जे. गणराज यांचे संदर्भात माहिती उपलब्ध नसल्याने ती पुरविता येत नाही असे विभागीय वनअधिकारी यांच्या दिनांक १९.३.२०१० च्या उत्तरात कळविल्याप्रमाणे तसे कळविण्यात येत आहे. त्यानंतर दिनांक १८.३.२०१० रोजी अपीलकर्ता यांना श्री. एम. जे. गणराज यांचे संदर्भामध्ये सेवापुस्तकातील नोंद झालेली त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व सेवापुस्तकाची छायांकित प्रत सुध्दा उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ६.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक २७.७.२०१० रोजी अपीलकर्ता यांना सेवा पुस्तकांची ६५ पृष्ठांच्या छायांकित प्रती पुरविण्यात आलेल्या आहेत. असे असले तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

९.	अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्या दिनांक २५.२.२०१० च्या अर्जा नुसार मुद्येनिहाय माहिती उपलब्ध झाली नाही. सेवापुस्तकांच्या पृष्ठांच्या छायांकित प्रतीमध्ये सूंपर्ण माहिती उपलब्ध नाही. श्री. एम. जे. गणराज हे सेवेत आहेत त्यामुळे त्यांच्या संदर्भातील संपूर्ण नस्ती ही स्वतंत्रपणे उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, श्री. एम. जे. गणराज यांचे संदर्भातील माहिती उपलब्ध नव्हती म्हणूनच त्यांना सेवा पुस्तकाच्या छायांकिंत प्रती उपलब्ध करुन दिल्या आहेत. परंतु जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे हे योग्य नाही असे दिसते. श्री. एम. जे. गणराज हे सेवेत आहेत तर त्यांची नस्ती असणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांच्या नस्तीच्या छायांकित प्रती मुद्येनिहाय जी उपलब्ध आहेत ती तसे कळवावे. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी यांना शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

... ७

१०.	अपील क्रमांक १०२८/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १०.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा वनसंरक्षक (मानव संसाधन विकास) वनभवन, नागपूर यांचेकडे श्री. सुरेश दशरथ अत्रे (आत्राम) यांची नियुक्ती झाल्यानंतर सेवेच्या संदर्भामध्ये व सरळ सेवा भरतीबाबतची नियमावलीची माहिती शिघ्र टपालाद्वारे मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १८.२.२०१० रोजी आपण सचिव, आदिवासी हलबा समाज समिती, चंद्रपूर या पद नावाने माहिती मागितलेली असल्यामुळे माहिती देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २५.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भात दिनांक २६.२.२०१० रोजी प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालयात वेगवेगळया कक्षाचे २८ माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी नेमण्यात आले आहेत. त्यामुळे योग्य त्या माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज करणे आवश्यक आहे असे त्यांनी कळविलेले दिसून येते. त्यांच्या तिन्ही अर्जात माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी - १३ मुख्य वनसंरक्षक कार्यालय यांचेकडे पाठविले आहे असे कळविले आहे. प्रथम अपीलाचे संदर्भात दिनांक १५.३.२०१० रोजी पुन्हा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १८.३.२०१० रोजी देण्यात आलेला दिसून येतो. पुन्हा दिनांक २०.३.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

११.	अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध असून सुध्दा ती देण्यास टाळाटाळ केली जाते व प्रथम अपीलाचे नंतर मात्र माहिती उपलब्ध करुन दिली जाते. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता हे सर्व अर्जामध्ये जी माहिती मागतात ती माहिती ही सदर कार्यालयात असली तरी ती नियुक्ती पासूनच सर्व मागत असल्यामुळे ती वेगवेगळया कार्यालयामध्ये असते. त्यामुळे ती माहिती उपलब्ध करुन देतांना विलंब होतो. तसेच अनेक कार्यालयास माहिती मागत असून जुनी माहिती संकलीत करुन देण्यास विलंब होतो. परंतु ती माहिती मोघम असते असे असले तरी माहितीचे निश्चित वर्णन असल्यास माहितीचा अतिरिक्त खर्च मागणे व माहिती उपलब्ध करुन देणे किंवा अधिनियमाचे कलम ६, ७, ८, ९ व ११ प्रमाणे सर्व कार्यवाही ही ३० दिवसात पूर्ण करणे अपेक्षित असते. त्याबाबत प्रधान वनसंरक्षक यांनी त्यांचे कार्यालयामध्ये सर्व माहिती अधिकारी व

... ८

अपीलीय अधिकारी यांना अधिनियमाचे तरतुदीचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. जेणे करुन माहिती ३० दिवसांत उपलब्ध करुन दिल्या जाईल. असे असल्याने अपीलकर्ता यांना मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता याचे अपील क्रमांक १०२४/२०१० व अपील क्रमांक १०२५/२०१० हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १०२६/२०१० हे अंशतः मंजूर करण्यात येत असून, अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत कामकाजाचे दिवशी तारीख व वेळ जनमाहिती अधिकारी यांना कळवून त्या दिवशी जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित होऊन नस्तीचे निरिक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी. अपीलकर्ता उपस्थित झाल्यावर त्यांना नस्ती निरिक्षणासाठी पुरविण्यात यावी व त्यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन द्यावी व पोच घ्यावी.

३) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १०२७/२०१० हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २५.२.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने मुद्येनिहाय माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.

४) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १०२८/२०१० हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १०.२.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने मुद्येनिहाय माहिती ही छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/९५६-९६३/१२.८.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०३५/२०१०.

श्री. भास्कर मंगलजी मोहुर्ले,
मु. पो. ता. लाखांदूर, जि. भंडारा - ४४१ ८०३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
जि. भंडारा.

श्री. एस. एस. दोनाडकर,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
कृषी उत्पन्न बाजार समिती,
ता. लाखांदूर, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १३.८.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १३.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १३.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. पी. एस. शेंडे, सहाय्यक निबंधक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.४.२०१० रोजी माहिती अधिकारी म्हणून कृषी उत्पन्न बाजार समिती, लाखांदूर यांचेकडे दोन मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २.८.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यावर अपीलकर्ता यांना माहिती मिळाली अशी पोच दिसून येत असल्यामुळे व तोंडी कबुली दिली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/९६४/१३.८.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८३७/२०१०.

श्री. प्रभाकर कारुदास ठवरे,
वैशाली नगर, खात रोड,
ता. जि. भंडारा - ४४१ ९०४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सु. स. सनगर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.

श्री. प्र. पां. लुबाळ,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.८.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.६.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४.७.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची पुढील सुनावणी आज दिनांक १६.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांचेकडे अर्जाच्या जोडीने स्पटीकरणात्मक पत्रात (Covering

... २

Letter) क्रमांक १ ते २ मध्ये आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील त्यामध्ये दिनांक ४.३.२०१० चा अर्जामधील माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी विनंती केलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २०.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २२.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, माहिती प्राप्त झाली परंतु अपील क्रमांक १६९९/२००७ व अपील क्रमांक १७००/२००७ मधील दिनांक २७.६.२००८ च्या निर्णयातील आदेश क्रमांक २ प्रमाणे शिस्तभंगाचे कार्यवाहीमध्ये फक्त समज देण्यात आलेली आहे. परंतु कडक कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांना माहितीपण दिलेली आहे व शिस्तभंगाचे कार्यवाहीची चौकशी करुन नंतर निर्णय देण्यात आलेला आहे. कडक समज देणे ही सुध्दा एक प्रकारची शिस्तभंग असल्यामुळे आयोगाच्या निर्णयाची अंमलबजावणी झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता याचे अपील हे निकाली काढण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८२०/२०१०.**

श्री. सुरेंद्र पुंडलिकराव रेवतकर,
प्लॉट नं. ३४५, हनुमान मंदीर जवळ,
आय. यु. डि. पी., ता. काटोल,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गृह सचिव कार्यालय,
मंत्रालय, मुंबई - ३२.

श्री. रा. सा. खोमणे,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.८.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.६.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १३.७.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची पुढील सुनावणी आज दिनांक १६.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून गृहसचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दिनांक ४.२.२०१० रोजी गृहसचिव श्री. प्रेमकुमार कृष्ण जैन प्रधान सचिव (विशेष) यांना गृह मंत्रालयाला येऊन दिलेली तक्रार यावर झालेल्या कार्यवाहीचे कागदपत्रे मिळण्याबाबत. तसेच १)

... २

दिनांक १५.५.२००९ ला मा. मुख्यमंत्री, २) दिनांक १८.५.२००९ ला जयंत पाटील, गृहमंत्री, ३) दिनांक २८.५.२००९ मुख्यमंत्री, ४) दिनांक २८.५.२००९ गृहमंत्री यांना झालेल्या निवेदन/तक्रार यावर केलेला कार्यवाहीचा अहवाल मिळवा. ५) दिनांक ४.२.२०१० रोजी मुख्यमंत्री, ६) दिनांक ४.२.२०१० रोजी गृहमंत्री यांना परस्पर भेटून दिलेली तक्रार यावर झाल्या कार्यवाहीचे कागदपत्रे मिळण्याबाबत. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून दिनांक ७.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला नाही मात्र दिनांक १२.७.२०१० रोजी अपीलकर्ता यांच्या दिनांक ४.२.२०१० चा अर्ज या विभागाचे पत्र दिनांक २३.३.२०१० रोजी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेला आहे. तसेच आपला दिनांक ६.४.२०१० चा माहितीच्या अधिकारातील अर्ज सहपत्रासह पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेला असून तद्नुषंगाने माहिती मिळविण्यासाठी आपण त्यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा अशी विनंती केलेली दिसून येते. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नव्हता म्हणून त्यांनी ३० दिवसांची मुदत संपल्यानंतर दिनांक ७.६.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्या कोणत्याही अर्जावर दखल मंत्रालयात घेतली गेली नाही व त्याबद्यल माहिती मागितली तरी सुध्दा ती दिली जात नाही व परस्पर कनिष्ठ कार्यालयाकडे कार्यवाहीसाठी पाठविली आहे अशा प्रकारची उत्तरे दिली जातात. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा तक्रार अर्ज दिनांक ४.२.२०१० चा हा दिनांक २३.२.२०१० रोजी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे पाठविला आहे. परंतु त्यांनी त्यावर काय कार्यवाही झाली हे कक्ष अधिकारी यांना कळविले नाही. अपीलकर्ता यांनी पुन्हा आयोगापुढे असे सांगितले की, त्यांचा दिनांक ४.२.२०१० च्या अर्जाचे संदर्भात पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठविला असे कळविले असते तर त्यांनी ती माहिती पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे मागितली असती. परंतु तसे कळविले नसल्यामुळेच ज्यांच्याकडे अर्ज केला त्यांचेकडे

माहिती मागितली तर त्यांनी ३ महिन्यांनी माहिती दिली. ती जर माहिती त्यांना ३० दिवसात उपलब्ध करुन दिली असती तर त्यांनी माहितीचा अर्ज हा पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयात दाखल केला असता. प्रथम अपील सुध्दा पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयातील प्रथम अपीलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी यांचे संदर्भात दाखल केले असते. म्हणून त्यांना आज उपस्थित करता आले असते. परंतु माहितीच्या अर्जाची दखल घेतली नाही, प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय दिलेला नाही व राज्य माहिती आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.६.२०१० रोजी कारणे दाखवा नोटीस निर्गमित केल्यानंतरच त्या विभागास जाग आलेली दिसून येते. म्हणून त्यांनी दिनांक १२.७.२०१० रोजी त्यांना माहिती कळविली व त्यामुळेच आज राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करुन सुध्दा काहीही निष्पन्न झालेले नाही. त्यामुळे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी अशी त्यांनी विनंती केली. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या दिनांक २७.४.२०१० चा अर्ज हा त्यांचेकडे विलंबाने प्राप्त झाला. परंतु विलंबाने प्राप्त झाल्यावर सुध्दा त्याबद्यलची कोणतीही माहिती ही अपीलकर्ता यांना दिलेली नाही. हे वरील विवेचनावरुन स्पष्ट होते व त्यामुळे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. संबंधित प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची दखल घेतली नाही व त्यांनी शासन निर्णयाची तसेच अधिनियमाचे तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे व त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही होणे जरुरीचे आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता याचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयातील अपीलकर्ता यांचा दिनांक ४.२.२०१० च्या अर्जाचे संदर्भात कार्यवाही काय केली व अंतीम निर्णय काय झाला याबद्यलची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. सदरचा रजिस्टर पोस्टाचा खर्च हा जनमाहिती अधिकारी यांनी स्वतः करावयाचा आहे. शासन निधीतून नाही.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक ६.४.२०१० च्या माहितीच्या अर्जाची जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दखल सुध्दा घेण्यात आलेली नसल्यामुळे व सदरचा अर्ज हा जनमाहिती अधिकारी यांचेकडे विलंबाने प्राप्त झाला असे त्यांचे म्हणणे असल्यामुळे सदरच्या विलंबास जे अधिकारी किंवा कर्मचारी जबाबदार असतील त्यांचे संदर्भात चौकशी करुन जबाबदारी निश्चित करण्यात यावी. जबाबदारी निश्चित केल्यानंतर त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात यावी व त्याप्रमाणे प्रधान सचिव, गृह विभाग यांनी शिस्तभंगाची कार्यवाहीची अंमलबजावणी करावी.

३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय ३० दिवसांत दिलेला नसल्यामुळे व त्याची दखल घेतली नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले दिसून येते व तसेच शासन निणर्याचे सुध्दा उल्लंघन केलेले दिसून येते. त्यामुळे त्यांचे विरुध्द प्रधान सचिव, गृह विभाग, मुंबई यांनी प्रशासकीय कार्यवाही करावी.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत **प्रधान सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई** यांचेकडे स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पोस्टाने पाठविण्यात यावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/९६७-९७०/१६.८.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११२३/२०१०.

श्री. दिपक टहलराम मोटवानी,
शिवाजी चौक, मेन रोड,
ता. आर्वी, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
ता. आर्वी, जि. वर्धा.

जनमाहिती अधिकारी तथा
पोलीस स्टेशन अधिकारी,
पोलीस स्टेशन, आर्वी,
ता. आर्वी, जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.८.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २९.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. माहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. सुरेंद्र कोहळे, पोलीस हवालदार हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. डी. जी. घोनमोडे, वाचक फौजदार हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा पोलीस स्टेशन, आर्वी यांचेकडे सन २००७ ते २०१० या कालावधीतील आर्वी थाना अंतर्गत गुन्हयांची माहिती मागितलेली दिसून येते.

... २

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३.८.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते. त्यात अपीलकर्ता यांनी मला दिनांक ३०.७.२०१० ला पोलीस स्टेशन, आर्वी कडून माहिती प्राप्त झाली आहे अशी पोच दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०४२/२०१०, अपील क्रमांक १०४३/२०१० व अपील क्रमांक १०४४/२०१०.**

श्री. श्यामराव रामचंद्र मालखंडाळे,
संत कबीर वार्ड, जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा समादेशक होमगार्ड,
तकीया वार्ड, जि. भंडारा.

श्री. एस. पी. दांडगे,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी,
जिल्हा समादेशक होमगार्ड,
तकीया वार्ड, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.८.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २६.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१.२०१०, दिनांक २.९.२००९ व दिनांक २.१.२०१० रोजी माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, जिल्हा समादेशक होमगार्ड, भंडारा यांचेकडे माहिती मागितलेली दिसून

... २

येते. सदरच्या तिन्ही अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक १६.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचेकडे फॅक्सद्वारे निवेदन सादर केले. त्यात माहिती अपीलीय अधिकारी यांचेकडून प्राप्त झाली आहे. करिता मी माझे तिन्ही अपीले मागे घेत आहे असे निवेदन सादर केल्यामुळे सदरची अपीले ही खारीज करण्यात येतात.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०५३/२०१०.**

श्री. अशोक केशव रामटेके,
मु. वरवट, पो. पद्मापूर,
ता. जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. पी. देशपांडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

श्रीमती एन. व्ही. कुंभरे,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.८.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २९.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे कार्यालयात स्व. राजीव गांधी विद्यालय, वरवट १९९५ ते १९९८ या विनाअनुदानीत वर्षातील संच निर्धारणातील कर्मचारी यादी व सेवाजेष्ठता यादी आणि वार्षिक निकाल पंजीची झेरॉक्स मिळण्याबाबत माहिती

... २

मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक १७.८.२०१० रोजी आयुक्त, राज्य माहिती आयोग यांना निवेदन सादर केले आहे. त्यात माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राजीव गांधी विद्यालय, वरवट यांनी माहिती दिनांक ७.८.२०१० अन्वये अहवाल दिलेला आहे. तो मान्य असून समाधान झाले आहे असे निवेदन दिले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११२९/२०१०.**

श्री. छोटेलाल मोतीलाल अग्रवाल,
कोठारी भवन, भाजीमंडी, इतवारी,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. एम. अंबाडेकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
रेल्वे स्टेशन रोड, नागपूर.

श्री. के. एस. कुंभरे,
जनमाहिती अधिकारी तथा
सुरक्षा व दक्षता अधिकारी,
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,
रेल्वे स्टेशन रोड, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.८.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सुरक्षा व दक्षता अधिकारी, राज्य परिवहन, नागपूर यांचेकडे दिनांक १९.२.२०१० रोजी आगार व्यवस्थापक, नागपूर-२ आगार हयांचे मार्फत

... २

विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, नागपूर हयांना सादर करण्यात आलेल्या तक्रारीच्या संदर्भात आता पर्यंत झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती मला व्यक्तिशः देण्यात यावी असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २.६.२०१० रोजी तक्रारीवर सुरक्षा शाखेमार्फत चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवाल विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, नागपूर यांना सादर करण्यात आला आहे. आपणास त्यासंबंधात काही कागदपत्रे पाहिजे असल्यास विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, नागपूर यांना अर्ज सादर करण्यात यावा असे कळविण्यात आलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १४.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भात दिनांक ३.७.२०१० रोजी निर्णय दिलेला असून सुरक्षा व दक्षता विभागातर्फे प्राप्त झालेला चौकशी अहवाल हा वर उल्लेखित अर्जदार हयांचे विरुध्द खातेमार्फत सुरु असलेल्या चौकशी संबंधी गोपनीय दस्तावेज असल्याने सदरची चौकशी पूर्ण होइस्तव देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांचे तर्फे त्यांचे प्रतिनिधी श्री. सुभाष वासुदेव उखारे यांनी युक्तिवाद केला. त्यांनी आयोगास असे सांगितले की, चौकशी अहवाल पूर्ण झालेला आहे. त्यामध्ये योग्यरितीने पाहणी करण्यात आली नाही किंवा योग्यरितीने पुरावा सादर करण्यात आलेला नाही. त्यामुळे चौकशी अहवालाची प्रत उपलब्ध होणे आवश्यक आहे. परंतु जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, चौकशीच्या संदर्भात अपीलकर्ता यांना दोषारोपणपत्र देण्यात आलेले आहे व दोषारोपणपत्रात सर्व कागदपत्रे सुध्दा देण्यात आलेली आहेत. चौकशी अहवालाच्या निष्कर्षावर अंतिम निर्णय झाल्या शिवाय माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही अन्यथा त्या चौकशी अहवालाचे संदर्भामध्ये निर्णय होण्यापूर्वी त्याचा गैरवापर होण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे अधिनियमाचे कलम ८(१)(ज) अन्वये माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे कळविलेले आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे जो खुलासा दाखल केलेला आहे तो खालील प्रमाणे आहे. अर्जदार हे राज्य परिवहन महामंडळ, नागपूर विभागात नागपूर-२ आगारात वाहक पदावर कार्यरत आहेत. सदर वाहक हे अपहारप्रवृत्त असून हयापुर्वी त्यांना एकूण १४

प्रकरणी वेगवेगळया शिक्षा खातेमार्फत झालेल्या आहेत. त्यामध्ये त्यांचे चार वेळा निलंबन झाले होते. तसेच त्यांना हयापुर्वी दोन वेळा खात्यामार्फत बडतर्फ सुध्दा करण्यात आले होते. विद्यमान न्यायालयाच्या आदेशान्वये दोन्ही वेळा पुनरस्थापित करण्यात आले. आता कामगिरीवर असतांना दिनांक १९.२.२०१० रोजी त्यांची पुन्हा बस तपासली असता अपहार आढळून आला. त्या अनुषंगाने त्यांना आरोपपत्र देऊन खाते मार्फत चौकशी सुरु आहे. हया घटनेसंबंधी कसूरदार वाहक श्री. अग्रवाल हयांनी तपासणी अधिकाऱ्यांविरुध्द खात्याकडे तक्रार दाखल केली. सदर तक्रारीची गोपनीय चौकशी सुरक्षा व दक्षता अधिकारी हयांचे मार्फत करण्यात आली. सुरु असलेल्या खातेमार्फत चौकशीमध्ये व्यत्यय आणण्याच्या गैरहेतुने सदर गोपनीय अहवालाची मागणी अर्जदार करीत आहेत. त्यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता याचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/९७७-९७९/१८.८.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११२७/२०१० व अपील क्रमांक ११२८/२०१०.

श्री. वसंत रोहीदास मून,
प्लॉट नं. २१, राणी दुर्गावती चौक,
नागपूर - ४४० ०१७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. आर. गणविर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
आरोग्य अधिकारी,
महानगरपालिका, नागपूर.

श्री. व्ही. ए. बागल,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक अधिक्षक,
आरोग्य विभाग,
महानगरपालिका, नागपूर.

श्री. अशोक पाटील,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त,
आसीनगर झोन क्र. ९,
महानगरपालिका, नागपूर.

श्री. डी. ई. रंगारी,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक अधिक्षक,
स्वास्थ विभाग, आसीनगर झोन क्र. ९,
महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.८.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता

व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या दोन्ही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १८.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपील क्रमांक ११२७/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ३.५.२०१० रोजी विभागीय झोनल अधिकारी (स्वास्थ), आशीनगर झोन क्र. ९, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे अर्जासोबत जोडलेल्या एकूण ९ मुद्यांच्या संदर्भामध्ये माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३१.५.२०१० रोजी मुद्या क्रमांक १ च्या संदर्भात माहिती दिलेली आहे व इतर मुद्यांच्या संदर्भात माहिती उपलब्ध नाही किंवा माहितीचा अधिकाराचा विषय होऊ शकत नाही असे कळविलेले आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ११.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक २८.६.२०१० रोजी मुद्या क्रमांक १ ते ९ ची कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस ७ दिवसांचे आंत देण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो व त्याप्रमाणे दिनांक २.७.२०१० रोजी ९ मुद्यांच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगाकडे असे सांगितले की, त्यांचे घराचे भोवती अनधिकृत फेरीवाले व मासोळी बाजार भरविण्यात येतो व त्यामुळे त्यांना घरात राहणे अशक्य झाले आहे. ते स्वतः महानगरपालिका कर्मचारी आहेत. परंतु तत्कालीन विभागीय अधिकारी आशीनगर झोन क्र. ९ श्री. एल. एस. खान यांचे पुढाकाराने संपूर्ण अवैध फेरीवाले त्या ठिकाणी कार्यरत आहेत. वेळोवेळी त्यांनी तक्रार केली होती. त्या तक्रारीची दखल घेण्यात येत नाही. कारण तत्कालीन झोनल आरोग्य अधिकारी यांची गारमेंट फॅक्टरी आहे. गॉरमेंट फॅक्टरी मध्ये व त्यांचे बंगल्यावर महानगरपालिकेचे ऐवजदार, सफाईदार कर्मचाऱ्यांतर्फे कामे करवून घेत असतात. त्यामुळे अनधिकृत फेरीवाल्यांचे संदर्भामध्ये तक्रार करुनही कोणतीही कार्यवाही होत

नसल्यामुळे त्यांनी सदरची माहिती मागितलेली आहे. परंतु त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व माहिती उपलब्ध नाही किंवा माहितीचा अधिकाराचा विषय होऊ शकत नाही असे त्यांना कळविलेले आहे. सध्या झोनल आरोग्य अधिकारी यांची गारमेंट फॅक्टरी महानगरपालिकेचे हद्दीत आहे. त्याबद्यलची माहिती सुध्दा ते उपलब्ध करुन देत नाही व झोन अधिकारी यांचे घराचे बांधकाम कोणत्या वर्षी केले त्याबद्यलची माहिती सुध्दा त्यांचे कार्यालयात नसल्यास त्यांनी ती नगर रचना विभागातून उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल व त्यामुळे त्यांना जी माहिती दिली ती अपूर्ण माहिती दिली असे त्यांचे म्हणणे आहे. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची माहिती ही जी उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती व त्यांना दिलेले उत्तर यामध्ये माहिती देण्याची टाळाटाळ करण्यात आलेली आहे असे दिसून येते. कारण ती माहिती आरोग्य अधिकारी यांचे संदर्भात मागितलेली दिसून येते व आरोग्य अधिकारी यांचे संबंधातील माहिती मागितली असेल तर आरोग्य अधिकारी हे अपीलीय अधिकारी सुध्दा राहू शकत नाही. आरोग्य अधिकारी यांचे संबंधी माहिती मागितलेली असल्यामुळे प्रथम अपील हे दुसऱ्या अधिकाऱ्यांकडे सोपविणे आवश्यक होते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे संदर्भामध्ये महानगरपालिका आयुक्त यांनी मागितलेल्या माहितीचे संबंधित अधिकारी यांना वगळून योग्य त्या माहिती अधिकाऱ्यांकडे व प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांकडे अपीलकर्ता यांचा अर्ज हा वर्ग करणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक ११२८/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १५.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा विभागीय झोनल अधिकारी (स्वास्थ), आशीनगर झोन क्र. ९, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे अवैध मास विक्रीचे दुकान इत्यादी संदर्भामध्ये एकूण ११ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ११.६.२०१० रोजी माहितीचे उत्तर उपलब्ध करुन दिलेले नाहीच परंतु पशुवैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका यांचेशी संबंधित असल्यामुळे माहिती तेथून प्राप्त होईल. महानगरपालिका अतिक्रमण विभागाशी संबंधित असून तेथून माहिती प्राप्त होईल अशा प्रकारे ११ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी

दिनांक २१.६.२०१० रोजी आरोग्य अधिकारी (स्वास्थ), आरोग्य विभाग, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये सुध्दा अपीलकर्ता यांना अपीलाचे सुनावणीस सहाय्यक आयुक्त, झोन क्रमांक ९, आसीनगर यांच्याकडे करणे योग्य होईल अशा प्रकारे आदेश दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

५. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती श्री. एल. एस. खान, झोनल अधिकारी यांचे संदर्भातील आहे. म्हणजेच त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व सदरच्या उत्तरामध्ये दिनांक ११.६.२०१० रोजी म्हणजे ३० दिवसांची मुदत संपण्याचे वेळेस वेगवेगळया खात्याकडून माहिती उपलब्ध होईल असे कळविलेले दिसून येते. वास्तविक अर्ज हा जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध नसल्यास अधिनियमाचे कलम ६(३) परंतुकाप्रमाणे ५ दिवसामध्ये अर्ज संबंधित खात्याकडे हस्तांतर करावयाचे असते. परंतु वरील अर्ज हा २६ व्या दिवशी हस्तांतर केलेला आहे. म्हणजे ३० दिवसात माहिती उपलब्ध होणार नाही याची काळजी घेण्यात आलेली आहे व इतर मुद्यांच्या संदर्भामध्ये जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ते उत्तर न देण्याची किंवा टाळाटाळ करावयाची लक्षण आहे. प्रथम अपील हस्तांतर करुन प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आलेली नाही. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांनी आता पर्यंत भरपूर तक्रारी केलेल्या आहेत त्यामुळे कोणीही कार्यवाही करीत नाही व त्यांच्या घराचे बाजूस मासविक्रीची दुकाने आहेत. त्यामुळे त्यांना राहण्यास त्रास होतो व आरोग्य अधिकारी सुध्दा लक्ष देत नाही. अतिक्रमण विभाग सुध्दा लक्ष देत नाही. कारण तत्कालीन अधिकारी श्री. एल. एस. खान यांचे हितसंबंध आहेत. म्हणूनच त्यांनी आरोग्य अधिकाऱ्यांची सुध्दा माहिती मागितलेली होती. परंतु ती सुध्दा माहिती त्यांना दिली नाही. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करण्यात आलेली आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे व त्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांनी विहित मुदतीत म्हणजे ५ दिवसांचे आंत अर्ज हस्तांतर केलेला नसल्यामुळे व माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केली असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु ते सेवानिवृत्त झाले आहेत असे असले तरी त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता याचे अपील क्रमांक ११२७/२०१० हे मंजूर करण्यात येत असून आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांनी सदरचा माहितीचा अर्ज व प्रथम अपील हे मागितलेल्या माहितीच्या संबंधीत नसलेल्या जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे वर्ग करण्यात येऊन अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ११२८/२०१० हे मंजूर करण्यात येत असून तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केली असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये २५०००/- शास्ती कां लादण्यात येऊ नये याबद्यलचा खुलासा त्यांनी विद्यमान जनमाहिती अधिकारी यांचे माध्यमातून आयोगाकडे १० दिवसात करण्यात यावा. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांना त्याबाबत आयोगाचा निर्णय निदर्शनास आणावा. तसे न केल्यास विद्यमान जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी किंवा तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी खुलासा न केल्यास त्यांचे विरुध्द रुपये २५०००/- शास्ती कायम करण्यात येईल.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत **<u>आयुक्त, महानगरपालिका, नागपूर</u>** यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११३४/२०१०.**

श्री. प्रमोदकुमार हरीशचंद्र अग्रवाल,
मनोहर चौक, पोलीस लाईन समोर,
ता. जि. गोंदिया. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
महाराष्ट्र राज्य को-ऑपरेटिव्ह आदिवासी विकास महामंडळ लिमिटेड,
आदिवासी विकास भवन, २ रा माळा, जुना आग्रा रोड, नाशिक - ४२२ ००२.

श्री. एन. एस. मांदळे,
जनमाहिती अधिकारी तथा
महाव्यवस्थापक,
महाराष्ट्र राज्य को-ऑपरेटिव्ह आदिवासी विकास महामंडळ लिमिटेड,
आदिवासी विकास भवन, २ रा माळा, जुना आग्रा रोड, नाशिक - ४२२ ००२. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.८.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा महाराष्ट्र राज्य को-ऑपरेटिव्ह आदिवासी विकास महामंडळ लिमिटेड, आदिवासी विकास भवन, २ रा माळा, जुना आग्रा रोड,

नाशिक यांचेकडे २००८-०९ आणि २००९-१० या कालावधीतील Custom Milling of Paddy बाबत

... २



एकूण १६ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती स्पिड पोस्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक ११.८.२०१० रोजी कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचेकडे निवेदन सादर केले आहे. सदर निवेदनामध्ये आज मुझे मांगी गई माहिती प्राप्त हो गई है तथा अब मुझे आपसे उपरोक्त विषय मे कोई भी शिकायत नही है तथा मै अपनी माहिती वापीस लेता असे लेखी निवेदन सादर केले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/९८५-९८६/१८.८.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११३५/२०१०.

श्री. वामन चिंतामन बोरकर (बोरसरे),
मु. पो. ता. गोरेगांव, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अनंत वालसकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी (राजस्व विभाग),
ता. जि. गोंदिया.

श्री. नागपूरे,
जनमाहिती अधिकारी तथा
अव्वल कारकुन,
उपविभागीय अधिकारी कार्यालय,
ता. जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.८.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, गोंदिया यांचेकडे जिवंत माणसाला मृत घोषित करुन त्यांची जमीन बळकावली. गैरअर्जदारावर कार्यवाही

... २

करुन ती फेरफार रद्द झाली पाहिजे अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२०१० रोजी सदर प्रकरणी माहिती मिळाली असल्याचे कबूल केले व रोजनामामध्ये स्वाक्षरी केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/९८७-९८८/१८.८.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११३९/२०१०.

श्री. रमन बिसन देशमुख
मु. हसारा रोड, शगुन कॉन्व्हेंट जवळ,
श्रीरामनगर, ता. तुमसर, जि. भंडारा - ४४१ ९१२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग),
जिल्हा परिषद, गोंदिया.

जनमाहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग)
जिल्हा परिषद, गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.८.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे सावित्रीबाई फुले ज्ञानपीठ प्राथमिक शाळा, बोंडे/नवेगांव बांध, त. अर्जुनी(मोर), जि. गोंदिया या शाळेत प्रभारी मुख्याध्यापक म्हणून केलेल्या दिनांक १२.८.१९९३ ते २.९.१९९८ पर्यंतच्या सेवाकाळाची वैयक्तिक मान्यता पत्र मिळणेबाबत. तसेच त्यांच्या स्वत:चे मान्यतेच्या संदर्भामध्ये व

... २

इतरांचे मान्यते संबंधामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. तसेच त्यांची वैयक्तिक मान्यतेचे पत्र शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडून मला पाहिजे आहेत अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती टपालाद्वारे पाठविण्यात यावी असे नमुद केलेले दिसून येते. दिनांक २८.१.२०१० रोजी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये मागितलेली माहिती ही प्रश्नोत्तर स्वरुपाची माहिती असल्यामुळे सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय दिनांक १६.१०.२००४ अन्वये मुद्दा क्रमांक ६ नुसार महाराष्ट्र माहितीचा अधिकार, २००५ चे कलम ८ (क) नुसार सदर माहिती प्रश्नोत्तर स्वरुपाची असल्यामुळे माहिती देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २५.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा दिनांक २७.४.२०१० रोजी गोंदिया जिल्हा परिषद १९९९ ला अस्तित्वात आली. तेंव्हा सदर शाळा विना अनुदान तत्वावर होती. त्यावेळेस विना अनुदान तत्वावर अप्रोल घेतले नाही. त्यामुळे अप्रोलची कॉपी या कार्यालयात प्राप्त नाही. अप्रोल पाहिजे असल्यास जिल्हा परिषद, भंडारा कडून करुन घ्यावे. या जिल्हा परिषदे अंतर्गत १२ वर्षाच्या नंतर आदेश देता येणार नाही. त्यामुळे सदर कार्यवाही जिल्हा परिषद, भंडारा कडून करुन घ्यावे. अप्रोल संबंधाने कोणताही प्रस्ताव आजतागायत सादर केले नसल्यामुळे आपण केलेली मागणी ग्राहय धरता येणार नाही व त्यासंबंधाने माहिती देता येणार नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी हे गैरहजर असून त्यांनी प्रतिनिधी पाठविलेला नाही. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१.२०१० रोजी जे उत्तर देण्यात आलेले आहे ते उत्तर हे अपीलकर्ता यांचा अर्ज न वाचता देण्यात आलेले असून अधिनियम अस्तित्वात आल्यानंतर त्याकाळी आदेश किंवा परिपत्रक काढले जातात हे सामान्य ज्ञान सुध्दा उपशिक्षणाधिकारी सारख्या अधिकाऱ्यास माहिती नाही असे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा केंद्रीय नियम आहे व त्यात २००५ च्या पुर्वी महाराष्ट्र शासनाने काढलेल्या एखादे परिपत्रक उल्लेख होणार नाही हे सुध्दा सर्व सामान्य ज्ञान आहे तेही उपशिक्षणाधिकारी यांना दिसून येत नाही. त्यामुळेच ते उपशिक्षणाधिकारी म्हणून काय काम करतात याबाबतची चौकशी करणे आवश्यक आहे. माहिती देण्यास

टाळाटाळ केलेली असल्यामुळे व आयोगापुढे हजर राहण्याचे टाळाटाळ केली असल्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये ५००/- ची शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रथम अपीलाचा निर्णय योग्य आहे. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी जी माहिती दिलेली आहे ती दिशाभूल करणारी असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये रुपये ५००/- ची शास्ती लादण्यात येते. सदरची शास्तीची वसुली त्यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-　　　दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/९८९-९९१/३०.८.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११४१/२०१०.**

श्री. केशव बळीराम तिडके,
द्वारा - सीमा मंगेश तडस, प्लॉट नं. ८०,
आखरे गॅस एजन्सीचे मागे, खरबी रोड,
भाग्यश्री नगर, नागपूर - ४४० ००९. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. एन. पांडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, चिमूर, जि. चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत शंकरपूर (चिमूर)
ता. चिमूर, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.८.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत, शंकरपूर (चिमूर) यांचेकडे स्वर्गीय श्री. नारायणराव गणपतराव भांडारकर, शंकरपूर यांचे मालकीचे घर व

... २

शाळेला भाडयाने दिलेली होती ती इमारत व आणखी काही असेल त्याबद्यल विषयांकित मालमत्ता सध्या कोणाचे नावावर आहे ते कळविणे. सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरचा अर्ज जनमाहिती अधिकारी हे उपलब्ध न झाल्यामुळे परत आलेला असल्यामुळे त्यांनी दिनांक ४.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १६.७.२०१० रोजी दिलेला असून अपीलार्थीस ४ वेळा संधी देऊनही सुनावणीस उपस्थित राहिले नाही. त्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. या कारणास्तव प्रकरण नस्तीबध्द केल्याचे दिसते. त्यानंतरही दिनांक २०.८.२०१० रोजी माहिती दिली नसल्यामुळे व सुनावणीचे दिवशी उपस्थित सुध्दा झाले नाही तरी सदर पत्र प्राप्त होताच अर्जदारास २४ तासात माहिती देण्यात यावी असा आदेश जनमाहिती अधिकाऱ्यास देण्यात आलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ग्राम विकास अधिकारी हे त्यांचे कार्यालयात आढळून येत नसल्यामुळे त्यांचे पाकीट परत आलेले आहे. परंतु ग्रामपंचायत कार्यालयामध्ये लिपिक हे असतातच तेंव्हा लिपिकांनी अर्ज स्विकारुन तो जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी यांचेकडे सादर करणे आवश्यक होते. मात्र त्या ऐवजी ग्रामपंचायतीच्या कार्यालयाने अर्ज न स्विकारण्याचा मार्ग पत्करलेला दिसून येतो व ही एक प्रकारे माहिती देण्यास टाळाटाळ करणे असे दिसून येते. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना अर्ज प्राप्त झाला नव्हता. प्रथम अपीलाचे आदेशानंतर सुध्दा अर्ज प्राप्त झालेला नाही व त्यामुळेच माहिती देता आलेली नाही. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी हे ४ सुनावणीस हजर झाले नाही. याचा अर्थ असा होतो की, जनमाहिती अधिकारी हे त्यांचे कर्मचारी यांनी माहितीचा अर्ज स्विकारावयाचा नाही असे ठरविलेले दिसून येते. त्यामुळे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये १०००/- ची शास्ती लादणे आवश्यक राहिल. जेणे करुन भविष्यात ते अर्ज नाकारणार नाही व माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन देतील. परंतु अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांना माहितीची आवश्यकता आहे व जनमाहिती अधिकारी यांनी माहिती आज आणलेली आहे व ती माहिती उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत व ती उपलब्ध करुन देत सुध्दा आहेत. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ३

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता याचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-  दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/९९२-९९४/३०.८.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११४०/२०१०.**

श्री. खटूजी संभाजी गुरनुले,
मु. नाग मंदिर कॉलनी, वार्ड नं. २,
पो. ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डी. एस. सावसागडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पं.),
पंचायत समिती, सिंदेवाही, जि. चंद्रपूर.

श्री. डी. एस. आकरे,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत सिंदेवाही,
ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.८.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत सिंदेवाही यांचेकडे नाग कॉलनीकडे जाणाऱ्या दक्षिण दिशेला व सिंचाई खात्याचे नहर व सार्वजनिक बांधकाम खात्याचे चंद्रपूर नागपूर रोड मधील जागेवर ग्रामपंचायत सिंदेवाहीने कोणत्या ठरावाद्वारे मुत्रीघराचे

... २

बांधकाम केले. त्या बांधकामावर झालेला खर्च. आज त्या जागेवर काय आहे व कोणत्या कारणाने याचे माहितीची आवश्यकता आहे. अंदाजे सन १९८६-८७ ते पुढील कालावधीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे संदर्भात दिनांक ४.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांनी सन १९८६-८७ मध्ये मुत्रीघर बांधकाम केले हे कोणत्या योजनेतुन बांधकाम केले व कोणत्या ठरावान्वे कोठे ही माहिती ग्रामपंचायत कार्यालयामध्ये उपलब्ध नाही. त्यामुळे त्यांचे खर्चाची सुध्दा नोंद नाही. आज त्या जागेवर श्री. दिपक सुधाकर पालपतुवार हयांचे स्वमालकीचे आर.सी.सी. मकान आहे. तसेच प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ७.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २५.६.२०१० रोजी देण्यात आलेला असून सदर माहितीचा शोध घेऊन माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश केलेला दिसून येतो. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी ग्राम पंचायतीचा ठराव व त्यावरील खर्चाची माहिती मागितलेली आहे. ग्राम पंचायत ठरावाचे इतिवृत्त असते व ते इतिवृत्त नष्ट केले जात नाही. त्यामुळे त्या इतिवृत्ताची माहिती त्यांना उपलब्ध झालीच पाहिजे अशी त्यांची धारणा आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेश देऊन सुध्दा माहिती उपलब्ध नाही असे आयोगापुढे सुध्दा जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी १९८६-८७ च्या पुढील इतिवृत्ताची तपासणी करुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे संपर्क साधून व जनमाहिती अधिकारी यांनी सुध्दा त्या दिवशी संपूर्ण दप्तर अपीलीय अधिकारी यांना उपलब्ध करुन देऊन माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता याचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी नोटीस काढून तसेच जनमाहिती अधिकारी यांनी संपूर्ण दप्तरासहीत उपस्थित राहण्याचे आदेश देऊन संबंधित इतिवृत्ताचा शोध घेऊन विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येईल.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये किरकोळ अर्ज क्रमांक ५/२०१०.

श्री. प्रा. अरुण प्रल्हाद उराडे,
घर नं. ३९९, आशीर्वाद नगर, वार्ड नं. २२,
चामोर्शी रोड, ता. जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**(आदेश पारित दिनांक ३१.८.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.६.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये किरकोळ अर्ज दाखल केले आहे. अपीलकर्ता यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३१.८.२०१० रोजी उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अर्जाची सुनावणी आज दिनांक ३१.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांचा किरकोळ अर्ज खारीज करण्यात येतो.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**